# अर्थबोधपत्रिका

आपल्या आजूबाजूस घडणाऱ्या विविध घटनांचा

'अर्थ'बोध करून देणारे मासिक

INDIAN SCHOOL OF POLITICAL ECONOMY LIBRARY
9/7/04

१ ● संपादकीय
३ ● इज 'इंडिया शायनिंग' ?
८ ● 'इंडिया शायनिंग' आणि इंदिरा गांधी
१२ ● मलेशिया: मुस्लिमेतर नागरिक व इस्लाम
१४ ● साम्यवादी चीनच्या भूमीवर धर्म अंकुरतोय !
१६ ● जागतिकीकरण व कामगार संघटना
२० ● नव्या शतकात वाचन हरविले ?
२२ ● जागतिकीकरणामुळे अमेरिकेतील नागरिक अडचणीत ?
२५ ● एका नाईलचे पाणी दहा देशांना !
२९ ● शांततेच्या पाऊलखुणा (आईनस्टीन इन्स्टिट्यूट)
३२ ● जगाच्या पाठीवर....
३४ ● कालप्रवाहात......

खंड ३ : अंक ४ जुलै २००४

भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी

**वार्षिक वर्गणी १००/- रुपये**

**(परदेशस्थ वाचकांसाठी $२०)**

वर्गणी डिमांड ड्राफ्ट/ मनीऑर्डर/ पोस्टल ऑर्डर/चेकने किंवा रोख **'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी'** या नावे पाठवावी. त्याबरोबर **नाव व संपूर्ण पत्ता पिनकोडसह कळवावा.**

---


**वर्गणीसाठी पत्ता :**

व्यवस्थापक,

**अर्थबोधपत्रिका,**

**भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी,** अर्थबोध, ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग, (रत्ना हॉस्पिटल जवळ) पुणे ४११ ०१६.

फोन : २५६५७१३२

: २५६५७२१०

फॅक्स : २५६५७६९७

ई-मेल : ispe@vsnl.com


---


**अर्थबोधपत्रिका**

**खंड ३ (अंक ४) जुलै २००४**

**संपादक - रमेश पानसे**

**संपादन साहाय्यक - राज्यश्री क्षीरसागर**


◆या अंकातील मजकुराबाबत आपण आपल्या सूचना आणि/किंवा अभिप्राय संपादकांच्या नावे संस्थेच्या पत्यावर पाठवावेत, अशी आपणास विनंती आहे.

## 'अर्थबोधपत्रिके'तील माहिती कशी?

## जी सहज चाळता येईल अशी !

◆भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी या संस्थेचे 'अर्थबोधपत्रिका' हे सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक व राजकीय विषयांवरील माहितीपूर्ण लेख देणारे प्रकाशन **वर्गणीदारांना दरमहा १० तारखेला पोस्टाने पाठविले जाते.** ◆मराठी वाचकांना विविध विषयांवर अभ्यासपूर्ण माहिती देणे आणि एखाद्या विषयाच्या सर्व बाजू निष्पक्षपणे व सोप्या शब्दांत देणे, हे या मासिकाचे उद्देश. ◆अनेक विषयांवरील सखोल माहिती व विश्लेषणात्मक लेख प्रसिद्ध करणारी जी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरची इंग्रजी भाषेतील नियतकालिके पुस्तके व इंटरनेटसारखी माध्यमे आहेत, व ज्यांतील माहिती एरवी मराठी वाचकांपर्यंत सहजतेने पोचत नाही, अशी माहिती मराठी वाचकांपर्यंत पोचविण्याचा हा प्रयत्न. ◆अंकातील लेख आपण आपल्या नियतकालिकात / वृत्तपत्रात प्रसिद्ध करू शकता. लेख प्रसिद्ध केल्यावर त्याखाली **अर्थबोधपत्रिका, भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीच्या सौजन्याने'** अशी ओळ प्रसिद्ध करावी एवढीच अपेक्षा आहे. ◆लेख प्रसिद्ध झाल्यावर संस्थेतर्फे मूल्य आकारण्यात येणार नाही. मात्र लेख प्रसिद्ध केलेला अंक संस्थेला अवश्य पाठवावा.

जनतेत क्षोभ उत्पन्न करण्यापेक्षा तिच्यात विचार उत्पन्न करणे हे कितीतरी महत्त्वाचे आणि कठीण कार्य आहे. - तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी.

# संपादकीय

भारतात अलीकडेच झालेल्या निवडणुकांचे अनपेक्षित निकाल लागून सत्तापालट झाला. सत्तापलटानंतर पुन्हा अनपेक्षितरित्या डॉ. मनमोहनसिंग पंतप्रधान झाले. पूर्वीच्या काँग्रेसच्या राजवटीत, पी.व्ही.नरसिंहरावांच्या पंतप्रधानपदाच्या कारकीर्दीत, भारतात नव्या आर्थिक धोरणांना प्रारंभ झाला; आणि त्यावेळी मनमोहनसिंग हेच अर्थमंत्री होते. त्यामुळे आपलीच आर्थिक धोरणे राबवायला त्यांना अधिक अवसर मिळेल असे मानले जाते. किंबहुना, आर्थिक क्षेत्राची अपेक्षाही हीच असावी, हे मुंबई शेअरबाजारातील १७ मे ची अभूतपूर्व अशी ११ टक्क्यांची घसरण आणि डॉ. मनमोहनसिंग पंतप्रधान होत असल्याची घोषणा होताच, दुसऱ्याच दिवशी झालेली ८ टक्क्यांची निर्देशांकातील सुधारणा, दाखवून देते.

अशा घटनांच्या पार्श्वभूमीवर, या अंकात दिलेले दोन लेख वाचकांना अधिक माहितीपूर्ण वाटतील. डॉ. मनमोहनसिंग यांनी अर्थमंत्री म्हणून, भारतीय अर्थव्यवस्था अतिशय अडचणीत असताना घेतलेले निर्णय देशाला नवीन आर्थिक धोरणाच्या मार्गावर घेऊन गेले. पण, त्याची सुरूवात या कालाच्याही दहा वर्षे आधीच, इंदिरा गांधी पंतप्रधान असताना कशी झाली होती, हे सांगणारा एक लेख आहे. तर दुसरा लेख, भाजप-एनडीए सरकारने, सरकारी पैशांनी उघडलेली 'इंडिया शायनिंग'ची निवडणूकपूर्व जाहिरात मोहीम, कशी मूळ आर्थिक समस्यांना, सामान्यांच्या आर्थिक जीवनाला ओलांडून जाणारी होती, याविषयीचे विवेचन करणारा आहे.

देशाबरोबर जगातही काही क्षेत्रात बदलांचे वारे वेगाने वाहताहेत. 'धर्म आणि राजकारण' यांची हातमिळविणी, जगालाच पुनश्च: एकदा धर्मसत्तांच्या दावणीला बांधायला निघाली असल्याचे चित्र वेगवेगळ्या देशांमधून प्रकर्षाने आढळत आहे. मलेशिया आणि साम्यवादी चीनमध्येही या संदर्भात काही घडते आहे, हे दाखविणारे दोन लेख या अंकात दिलेले आहेत.

कामगार, कामगार संघटना यांचे अस्तित्वच धूसर होत असल्याचे चित्र जागतिकीकरणाच्या रेट्यात आढळून येत आहे. अशा बदलांचा वेध घेणारा लेख वाचकांना आवडेल असे वाटते. 'नाईल नदीच्या पाणी वाटपा'च्या प्रश्नासारखे इतर अनेक लेख विषयांची विविधता घेऊन आले आहेत. वाचक या अंकातील लेखांवर प्रतिक्रिया व्यक्त करतील अशी आशा आहे. ■■

# विज्ञान-संशोधन व स्त्रिया

विज्ञानक्षेत्र व त्यातील संशोधन फार वेगाने पुढे जात आहे; मात्र या क्षेत्रातील स्त्रियांची संख्या फारशी वाढलेली दिसत नाही. संपूर्ण जगातच हा विषय आता प्राधान्याने चर्चिला जातो आहे. लक्षात घेण्यासारखा मुद्दा असा की, विज्ञान शिकण्यात स्त्रिया मागे नाहीत. उदाहरणार्थ भारतात, पदवीपरीक्षेसाठी नोंदविलेल्या मुलींमध्ये पदार्थविज्ञान शिकणाऱ्या मुलींची संख्या १९६९ मध्ये २० टक्के होती; ती आता ३० टक्क्यांपर्यंत वाढलेली दिसते. रसायनशास्त्र व त्यासंबंधीच्या विषयांचे शिक्षण घेणाऱ्या मुलींची संख्या तर पदार्थविज्ञानाच्या तुलनेने अधिकच वाढली आहे, असे आढळते. भारतात, विज्ञानक्षेत्रात विविध विद्यापीठांमधून वा संस्थांमधून डॉक्टरेट मिळविणाऱ्या स्त्रियांची संख्याही वाढली आहे. तरीदेखील संशोधनक्षेत्रात महत्त्वाच्या पदांवर स्त्रियांची संख्या मात्र कमीच आहे. याचे कारण शैक्षणिक नव्हे तर, कौटुंबिक असल्याचे स्पष्ट झाले आहे.

पदव्युत्तर दोन वर्षे म्हणजे एम.एससी केल्यानंतर विज्ञानक्षेत्रात संशोधन करता करता वयाची तिशी येते आणि त्यानंतर आणखी संशोधन करून संशोधनक्षेत्रात उच्चपदी जाण्यासाठी आणखी दोन-चार वर्षे खर्ची घालण्याचे धाडस या स्त्रिया करू शकत नाहीत. कारण त्यांचे विवाहाचे व अपत्यसंगोपनाचे वय वाढणे हेही योग्य ठरत नाही. त्याशिवाय विवाहानंतर घर चालविण्याची व अपत्यसंगोपन आणि त्यांचे शिक्षण या सर्व जबाबदाऱ्या जगात आणि विशेषतः भारतीय कुटुंबव्यवस्थेत स्त्रियाच समर्थपणे पार पाडीत असतात. घरच्या या जबाबदाऱ्या वेळखाऊ आणि मानसिक व शारीरिकदृष्ट्या दमवणाऱ्या असतात. त्यातून विज्ञान-संशोधन क्षेत्रातील व्यावसायिक बांधिलकी सांभाळणे त्यांना शक्य होत नाही. घर सांभाळण्याचे हे कौटुंबिक व सामाजिक काम कुठेच मोजले जात नाही. त्यामुळे बाहेरचे क्षेत्र सोडण्याचाच मार्ग अनेक स्त्रियांना स्वीकारावा लागतो. स्त्रियांचा या क्षेत्रातील सहभाग वाढविण्यासाठी आता विशेष योजना आखण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. कामाच्या वेळा लवचिक ठेवणे, मुलांना सांभाळण्याची सोय असणे, करियर करताना घरगुती प्रश्न सहानुभूतीने समजून घेणे आणि करियरमध्ये खंड पडला असला तरी पुन्हा करियर करण्याची संधी उपलब्ध करून देणे इत्यादींचा यात समावेश आहे. (संदर्भ - 'द हिंदू' मधील संपादकीय, १२ जून २००४) ■■

आर्थिक

# इज इंडिया शायनिंग ?

भारतीय संसदेच्या आत्ताच्या सार्वत्रिक निवडणुकांपूर्वी 'शायनिंग इंडिया'ची खूप मोठी जाहिरात तत्कालीन सत्तेवरील पक्षाने केली होती. निवडणुका जिंकण्यासाठी ती एक व्यूहरचना होती हे स्पष्टच आहे. सामान्यतः आक्षेप घेतला जात होता तो त्यासाठी सरकारी पैसा, म्हणजे, भारतीय नागरिकांचा पैसा वापरला यावर. याच पैशाने राष्ट्रीय महामार्गावर, पंतप्रधानांच्या छबीसहित सुवर्ण चतुष्कोनाच्या जाहिराती लावल्या गेल्या होत्या. आणि निवडणूक आयोगाने फटकारल्यावर, पुन्हा त्या झाकण्यासाठी (काढण्यासाठी नव्हे ! कारण, या निवडणुका जिंकल्याच असत्या तर त्या पुन्हा दिमाखाने उघड करता आल्या असत्या !) लाखो रुपये, तेही पुन्हा भारतीय नागरिकांचेच खर्च केले गेले.

'शायनिंग इंडिया'ची जाहिरात ही, भारत सरकारने राबविलेली दूरदर्शनच्या इतिहासातील सर्वात मोठी जाहिरात मोहीम होती, असे संपर्कसाधनांच्या विश्लेषणात आढळून आले आहे. डिसेंबर २००३ आणि जानेवारी २००४ या दरम्यान 'शायनिंग इंडिया'ची जाहिरात एकूण ९४७२ वेळा प्रदर्शित करण्यात आली. (फक्त डाससंहारक 'ऑल आऊट'चा क्रमांक याच्या वरचा होता; ती जाहिरात १०,३९२ वेळा प्रदर्शित केली गेली !) केवळ जानेवारी २००४ च्या पहिल्याच पंधरवाड्यात ४५० वृत्तपत्रांतून ३९२ वेळा ही जाहिरात करण्यात आली. अशी काळजीही घेण्यात आली की, कोट्यवधी रुपये खर्चून केलेली ही जाहिरात भारताच्या काना-कोपऱ्यातील लोकांपर्यंत पोचेल; आणि भारत 'चमकतोय' हे त्यांना कळेल.

अलीकडेच, 'इज इंडिया शायनिंग' या शीर्षकाखाली एक पुस्तिका, एस.पी.शुक्ला, मुचकुंद दुबे, कमलाप्रसाद आणि के. अशोक राव यांनी प्रकाशित केली आहे. या पुस्तिकेचे वैशिष्ट असे आहे की, अनेक अधिकृत संदर्भांचा आधार घेऊन, लेखकांनी, 'इंडिया शायनिंग' या जाहिरातीचा आशय कितपत खरा आहे याचा खोलवरचा शोध घेतला आहे. किंबहुना असा शोध घ्यायला उद्युक्त केल्याचे श्रेयही त्यांनी या जाहिरातींना दिले आहे. अगदी मूलभूत प्रश्नांचा शोध आकडेवारीच्या आधारे घेण्याचा प्रयत्न या पुस्तिकेच्या लेखकांनी केला आहे. प्रथमतःच त्यांनी असे मत

व्यक्त केले आहे की, देशाचे, अर्थव्यवस्थेचे असे अनेक प्रश्न असतात की जे देशातील बहुसंख्य लोकांच्या दैनंदिन जीवनाला ग्रासून असतात. किंबहुना या प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी काय काय करण्यात आले यावरून देशाच्या प्रगतीची दिशा ठरत असते. त्यामुळे त्यांना राजकीय क्षेत्रात प्राधान्य मिळायला हवे. परंतु जात, धर्म याच गोष्टी प्रकर्षाने पुढे केल्या जातात.

'कुणाचा भारत चमकतोय ?' असा प्रश्न लेखक, सुरूवातीलाच विचारतात आणि त्याच्या उत्तराचा शोध घेतात.

- श्रीमंत आणि गरीब यांच्याचप्रमाणे ग्रामीण आणि शहरी विभाग यांमधील दरी सर्वश्रुतच आहे. १९९७ ते २००२ या काळात, शहरी लोकसंख्येपैकी वरच्या २० टक्के लोकांचा उपभोग ३० टक्क्यांनी वाढला; तर ग्रामीण भागातील ८० टक्के लोकांच्या बाबतीत प्रत्यक्ष उपभोगाची पातळी कमी झाली आहे.

- युनोच्या 'अन्न व शेती संघटने'ने असे दाखवून दिले आहे की भारतातील वीस कोटी लोक कुपोषित आहेत.

- १९९७-९८ मध्ये, दरमाणशी १७४.३ किलोग्रॅम्स इतकी धान्याची उपलब्धता होती. ती खाली घसरून २००२-२००३ साली १५७.७ किलोवर आली. इतकी खालची पातळी, यापूर्वी फक्त, दुसऱ्या महायुद्धाच्या सुरूवातीच्या काळात - बंगालच्या प्रसिद्ध दुष्काळाच्या काळांत होती.

- १९९९-२००० साली भारतातील ७७ टक्के ग्रामीण लोकसंख्येच्या बाबतींत अन्नाद्वारे मिळणाऱ्या उष्मांकांचे (कॅलरीजचे) प्रमाण, दारिद्र्यरेषेने निर्धारित केलेल्या पोषणाच्या निकषांच्याही खाली होते.

- भारतातील बहुसंख्य लोकांचे मुख्य अन्न तांदूळ हे आहे. त्यामुळे, आणि विशेषतः गरिबांच्या बाबतीत तांदुळाचे भाव हा फार संवेदनशील असा विषय असतो. त्यांचे जीवनमान याच्याशी बरेचसे निगडित असते. जे लोक दारिद्र्यरेषेच्या अगदी नजिक आहेत अशांसाठी स्वस्त धान्य दुकानांतून दिला जाणारा तांदूळ हा १०.८७ रुपये प्रतिकिलो असा दिला गेला. परंतु सरकारने, याच काळात, तांदुळाची निर्यात मात्र ५.४५ रुपये किलो या दराने केली; आणि तीही तुलनेने श्रीमंत असलेल्या देशांना. विरोधाभास असा की, आंध्र प्रदेशातील दुष्काळग्रस्त भागांतील स्वस्त धान्य दुकानांतून दारिद्र्यरेषेखालील लोकांना तांदूळ ६. ४ रुपये किलो या भावाने, म्हणजे, निर्यातदरापेक्षाही जास्त भावाने विकला जात होता. ( याच आंध्रप्रदेशात जो राजकीय पक्ष सत्तेवर आला

होता तो 'तांदूळ दोन रुपये किलो' या घोषणेच्या नि आश्वासनाच्या आधारावर !)

- भारतात एक विसंगत दृष्य दिसते आहे. एकीकडे अन्नधान्याचा साठा, अन्न महामंडळाच्या गोदामांतून वाढत चालला आहे, तर दुसरीकडे लाखो भुकेली तोंडे 'आ' वासून आहेत. जुलै २००२ मध्ये असा धान्य साठा ६ कोटी ३१ लाख टन इतका होता. इतका साठा वाढला याचे सरळ कारण असे होते की, धान्य खरेदीसाठी लागणारी क्रयशक्तीच गरिबांकडे नव्हती. पुस्तिकेच्या लेखकांचे म्हणणे असे आहे की, हाच धान्यसाठा, 'कामासाठी धान्य' किंवा अशाच काही गरिबी निर्मूलनाच्या योजना आखून, त्यांकरवी गरिबांची क्रयशक्ती वाढविण्यासाठी वापरता आला असता. परंतु सरकारने तसे न करता, जून २००२ ते नोव्हेंबर २००३ या कालावधीत अन्नमहामंडळाच्याद्वारे एक कोटी ७० लाख टन धान्याची निर्यात केली; आणि ही सुद्धा अर्थातच, अत्यंत कमी किंमतीत. आपल्या लोकांपेक्षाही इतर देशांतील लोकांना स्वस्तात. अलीकडे, असेच किंमत घटीच्या रूपांत अर्थसहाय्य करून बराच मोठा साठा खाजगी विक्रेत्यांना, खुल्या बाजारातील विक्रीसाठी उपलब्ध करून दिला. अर्थसहाय्याची अशी रक्कम सुमारे १९५०० ते २३००० कोटी रुपयांच्या घरात जाते.

- 'द हिंदू' या दैनिकातील सी. राममनोहर रेड्डी यांच्या एका लेखाचा आधार घेऊन या पुस्तिकेत एक तक्ता (खालील तक्ता पाहावा) दिला आहे. त्याद्वारे, सरकारच्या वाढत्या विकासदराचा जाहिरातींमधून करण्यात येणारा दावा हाणून पाडला

**<u>वाढीचे दर टक्केवारीने</u>**

| कालावधी | राष्ट्रीय उत्पन्न | शेती उत्पन्न | उद्योग उत्पन्न | व्यापार निर्यात | अदृष्य(सेवारुप) निर्यात |
|---|---|---|---|---|---|
| १९९२-९३ ते १९९७-९८ (काँग्रेस, युडीएफ) | ६.६ | ३.४ | ८.२ | १३.१ | १८.९ |
| १९९८-९९ ते २००३-२००४ (बी.जे.पी.,एन.डी.ए.) | ३ | १.९ | ५.४ | १०.० | ११.१ |

आहे. लेखकांचे म्हणणे असे आहे की, गेल्या पाच वर्षांमध्ये, भारतीय अर्थव्यवस्थेची कामगिरी घसरलेलीच आहे. त्यांनी सर्वात मोठे आश्चर्य, व्यक्त केले आहे ते म्हणजे, सरकार सातत्याने दावा करीत आहे की, सेवारूप निर्यातीकरवी मिळणारे उत्पन्न, आपल्या कारकीर्दीत, मोठ्या प्रमाणावर वाढले आहे. परंतु रिझर्व्ह बँकेच्या आकडेवारीनुसार दिसून येते की, मागील काळापेक्षा ते कमी वेगाने वाढले आहे.

● उत्पन्नाबाबतची स्थितीही समाधानकारक नाही, असे प्रत्ययाला येते. नॅशनल कौन्सिल ऑफ ॲप्लाईड इकॉनॉमिक रिसर्चच्या २००२ सालच्या आकडेवारीनुसार, भारतात १८.०७ कोटी कुटुंबे आहेत. म्हणजे, सरासरीने प्रत्येक कुटुंबात पाचपेक्षा थोडी जास्त, अशी सदस्यांची संख्या आहे.

या कुटुंबापैकी ३२.८ टक्के कुटुंबांचे सरासरी उत्पन्न वार्षिक २२५०० रुपयांपेक्षा कमी असून आणखी ४० टक्के कुटुंबांचे उत्पन्न २२५०१ ते ४५००० रुपयांच्या गटात आहे. आणि फक्त उच्चवर्गात असणाऱ्या ६.७ टक्के कुटुंबांचे वार्षिक उत्पन्न ९६००० रुपयांपेक्षा जास्त आहे.

पुस्तिकेच्या लेखकांचे म्हणणे असे आहे की, केवळ याच छोट्या गटांना 'बरं वाटतंय्' ('फील गुड फॅक्टर' फक्त त्यांच्याच बाबतीत आहे ! )

> रिलायन्स उद्योगाच्या धीरूभाई अंबानी यांचे शेवटचे वेतन वार्षिक नऊ कोटी रुपयांचे होते. कालाहंडीमधील गरीब शेतकऱ्याच्या उत्पन्नाशी तुलना करता हे ३० हजार पटींनी जास्त होते.

● भारतातील बहुसंख्य लोक अजूनही खेड्यांमधूनच राहतात; आणि त्यांचा मुख्य व्यवसाय शेती हाच आहे. परंतु सरकारी धोरणांनी त्यांच्या संदर्भात काय केले आहे ? असा प्रश्न पुस्तिकेच्या लेखकांनी उपस्थित केला आहे.

अगदी ग्रामीण भागातील लोकांना कर्जपुरवठा व्हावा या हेतूने बँकांच्या अनेक शाखा, विशेषतः राष्ट्रीयीकरणानंतर उघडल्या गेल्या. परंतु या शाखा बंद करून शहरी शाखा, अर्थातच नफ्याच्या हेतूने उघडण्यासाठी सरकारने बँकांना प्रोत्साहित केले आहे. उदाहरणार्थ, ३१ मार्च ९४ ला ३५३२९ बँक शाखा होत्या, त्या ३१ मार्च २००२ ला ३२४८१ पर्यंत खाली आल्या. म्हणजे, या कालावधीत २८४८ ग्रामीण शाखा बंद करण्यात आल्या. त्याबदल्यात शहरी शाखांची संख्या मात्र ७२५३ ने वाढविण्यात आली. परिणामतः पुन्हा एकदा ग्रामीण जनतेला सावकारांच्या तावडीत देण्यात आले.

शिवाय सरकारने धान्यखरेदी कमी केली आणि जलसिंचनावरची गुंतवणूकही कमी केली. मात्र मोठ्या कंपन्यांना करार-शेतीच्या नावाखाली जमिनी उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. हिंदुस्थान लिव्हर, रॅलीज, पेप्सी, निज्जार, मॅकडोनाल्डस् अशी अनेक उदाहरणे आहेत.

## पर्यटन, गोल्फ आणि पाणी

पर्यटन वाढवून त्याद्वारे आर्थिक उत्पन्न मिळविण्याचा मार्ग अलीकडे बरेचदा सुचविला जातो. पर्यटकांना आकर्षित करणारे ॲम्युझमेंट पार्क्स व गोल्फ कोर्टस हे यामागोमाग येतातच. मुंबईच्या परिसरात असे २४ पार्क्स आहेत आणि त्यासाठी दररोज ५० अब्ज लिटर्स पाणी खर्च केले जाते. उन्हाळ्यात पाण्याची चणचण भासणाऱ्या एक लाख खेड्यांसाठी हे पाणी किमान दोन महिने तरी पुरू शकते. आणि भारतात २० कोटी लोकांना पिण्याचे पाणीही उपलब्ध होऊ शकत नाही.

ग्रामीण कर्जबाजारीपणा वाढल्याचे पर्यवसान शेतकऱ्यांच्या आत्महत्यांच्या वाढत्या प्रमाणात झाले. अशा आत्महत्यांचा आकडा दहा हजारांवर गेला आहे. याचे राज्यवार आकडेही उपलब्ध आहेत.

● यू.एन.डी.पी.च्या अलीकडच्या अहवालानुसार २००१ साली १६२ राष्ट्रांच्या यादीत, मानव विकास निर्देशांकाच्या बाबतीत, भारताचा क्रमांक ११५ वा होता. तो २००२ साली खाली घसरून १७३ राष्ट्रांच्या यादीत १२४ वा झाला. पुढे २००३ साली हा क्रमांक आणखी घसरून १७५ देशांच्या यादीमध्ये १२७ वा झाला आहे. ■■

## मोन्सॅन्टो कंपनीचे साम्राज्य

बी-बियाणे तयार करण्यात मोन्सॅन्टो ही बहुराष्ट्रीय कंपनी अग्रेसर आहे. महिको-मोन्सॅन्टो ही कंपनी महाराष्ट्रात बी-बियाणे विकते. या कंपनीचे जैवतंत्रज्ञानयुक्त कापसाचे बी (Bt Cotton) १६००/ रुपये प्रति बॅग या दराने विदर्भातील वर्धा या गावातील शेतकऱ्यांसाठी उपलब्ध होते. तर पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठातील बियाणे ३०० ते ४३० रुपये प्रति बॅग या दराने उपलब्ध होते. म्हणजे खतांवरील खर्च धरूनही शेतकऱ्यांसाठी कृषि विद्यापीठातील बियाणे वापरणे स्वस्त ठरले असते. पण जे शेतकरी मोन्सॅन्टोचे बियाणे विकत घेण्यास तयार नव्हते त्यांचे कर्ज रोखण्यात आले होते.

आर्थिक

# 'इंडिया शायनिंग' आणि इंदिरा गांधी

भारतात, अलीकडेच (मे -२००४), लोकसभेसाठी झालेल्या निवडणुकीत डॉ. मनमोहनसिंग यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेस व मित्रपक्षांचे सरकार स्थापन झाले आहे. निवडणुकांपूर्वीच्या काँग्रेस विरोधकांनी केलेल्या प्रचारावर विश्वास ठेवायचा झाला तर, आता भारत एक आर्थिक शक्ती म्हणून उदयास येत आहे ('इंडिया शायनिंग') आणि अशा भारताचे नेतृत्व आज डॉ. मनमोहनसिंग यांच्या हाती आले आहे.

खरे तर, एका अर्थाने डॉ. मनमोहनसिंग यांनी सुरू केलेल्या आर्थिक सुधारणांचा झेंडा आता परत त्यांच्याच हाती आला आहे. कारण, डॉ. मनमोहनसिंग भारताचे अर्थमंत्री असताना (१९९१) भारतात आर्थिक संकट निर्माण झाले होते, त्यावेळी ते आव्हान समर्थपणे पेलून त्यांनी आर्थिक सुधारणांचा कार्यक्रम नेटाने राबविण्याचा प्रयत्न केला. भारतातील उद्योगांना अडचणीचे ठरणारे लायसन्स व परमिट राज संपविणे आणि परकीय गुंतवणुकीचा मार्ग खुला करणे, हे त्यांच्याच कारकीर्दीत घडले. (अगदी न्यूजप्रिंटवरील कर रद्द करून वृत्तपत्रांनाही त्यांनी आपल्या हाती ठेवले !) १९९२ नंतरच्या दशकात भारतात आर्थिक वाढीचा दर ५.९ टक्के एवढा राहिला. आता डॉ. मनमोहनसिंग यांनी पंतप्रधानपद स्वीकारले असताना, एकीकडे, भारतात आर्थिक सुधारणांची गती वाढेल अशी आशा काहींना आहे; तर दुसरीकडे, आतापर्यंत झालेल्या आर्थिक सुधारणा योग्य की अयोग्य, अशी चर्चाही होत आहे. कारण, काहींच्या मते आर्थिक सुधारणांमुळे भारताच्या उद्योगक्षेत्राचे नुकसान झाले आहे.

भारतातील आर्थिक सुधारणांच्या संदर्भात, डॅनी रॉड्रिक (हार्वर्ड युनिव्हर्सिटी) आणि अरविंद सुब्रमणियन (आंतरराष्ट्रीय नाणेनिधी) या दोन अभ्यासकांनी काही वेगळे विचार मांडले आहेत. त्यांच्या मते भारतातील आर्थिक सुधारणा १९८० मध्येच सुरू झाल्या. १९९१ च्या आर्थिक संकटाच्या दहा वर्षे आधीचा काळ हा, या सुधारणांच्या काळापासून वेगळा करता येणार नाही, असे त्यांना वाटते. १९८० च्या दशकात आर्थिक वाढीचा दर ५.८ टक्के होता आणि खरोखरच कधीकधी अर्थव्यवस्थाही उभारी धरते ! १९८४ मध्ये राजीव गांधी यांचे सरकार होते, आणि त्याही आधी म्हणजे १९८० मध्ये इंदिरा गांधी यांचे सरकार होते. आणि इंदिरा गांधींनी, राजकीय सत्तेचा विचार करून

उद्योगांना जवळ करण्याच्या उद्देशाने, ('उद्योजकांचा मतदारसंघ' असा विचार करून) उद्योगांसंदर्भात सुधारणा करण्याचा निर्णय घेतला. म्हणजे आजच्या आर्थिक सुधारणांचे धागेदोरे हे सोनिया गांधी यांचे आर्थिक सूत्रधार डॉ. मनमोहनसिंग (१९९१) वा सोनिया गांधी यांचे पती राजीव गांधी (१९८४) यांच्यापर्यंतच नव्हे तर ते सोनिया गांधी यांच्या सासूबाई इंदिरा गांधीपर्यंत (१९८०) जाऊन पोचतात.

१९८० च्या दशकातील आर्थिक वाढीच्या दराबद्दल अरविंद पनगारिया (अर्थतज्ज्ञ, कोलंबिया युनिव्हर्सिटी) यांचे म्हणणे असे आहे की, '१९८८ पर्यंत आर्थिक वाढीचा दर मंदच होता. मात्र १९८८ ते १९९१ या काळात ७.६ टक्के या दराने ही वाढ झाल्याने १९८० च्या दशकाची सरासरी वाढलेली दिसते.' असे असले तरी डॅनी रॉड्रिक आणि अरविंद सुब्रमणियन हे आपल्या मताला चिकटून आहेत. १९८० च्या दशकात आणखी एक घटना घडली; ती म्हणजे, १९७० च्या दशकात कामगारांची उत्पादनक्षमता ०.९ टक्के वा त्यापेक्षा कमी दराने वाढत होती, ती १९८० च्या दशकात ३.७ टक्के दराने वाढली. मात्र, १९९० च्या दशकात तिची गती मंदच राहिली.

डॅनी रॉड्रिक आणि अरविंद सुब्रमणियन यांच्या मते सुधारणांचा काळ आणखी आधी म्हणजे १९८० च्या काळापर्यंत जाऊ न पोचतो. १९७० च्या दशकापर्यंत, भारतातील उद्योगांना परदेशातील उद्योगांच्या स्पर्धेला कधी सामोरे जावे लागले नाही. भारताने त्यांना संरक्षण दिले होते. जनता सरकारच्या प्रयोगानंतर इंदिरा गांधी पुन्हा सत्तेवर आल्या, तेव्हा त्यांनी (१९८० मध्ये) राजकारणात सर्वसामान्य नागरिकांच्या पाठिंब्याबरोबरच, उद्योजकांचा पाठिंबा व समर्थन महत्त्वाचे मानले. राजकारणातील ही बदललेली विचार धारा उद्योजकांना गरजेची वाटली. कारण, त्यांच्या मते, भांडवलशाहीसाठी आता भारत संरक्षित होण्याची ती नांदीच होती. त्या काळात, केंद्र सरकार व राज्य सरकार यांच्यात जेथे जेथे चांगले संबंध होते, तेथे तेथे विविध उद्योगांमधील सरकारी हस्तक्षेप कमी होऊ लागला. पण खुली बाजारपेठ व्हावी, यासाठी मात्र तेव्हा प्रयत्न करण्यात आले नाहीत.

अर्थात, पनगारियांच्या मते १९९१ चे खुले आर्थिक धोरणच या संदर्भात महत्त्वाचे ठरते. डॉ. मनमोहनसिंग यांनी १९९१ मध्ये ज्या आर्थिक सुधारणा राबविल्या त्याचा पाया राजीव गांधीच्या काळात काही प्रमाणात घातला गेला होता. १९८४ मध्ये राजीव गांधींनी उद्योजकांना परदेशांतील भांडवली साधनसामग्री आयात करण्याबाबत थोड्या सुविधा उपलब्ध करून दिल्या होत्या. तसेच करात कपात आणि आयातीत

सवलती दिल्या होत्या. लायसन्स व परिमट राज त्यांनी थोडेसे शिथिल केले होते. भारतीय मोटार उद्योगात मारूती सुझुकीचे पाय याच काळात रोवले गेले. या सुधारणांच्या नंतरच १९९१ च्या सुधारणा आणखी वेगाने आणि जोरकसपणे पुढे आल्या.

१९८० पासून आर्थिक सुधारणा सुरू झाल्या असे म्हटले, तर त्याला आता दोन दशके झाली आहेत. या दोन दशकांचा भारताचा अनुभव हा अर्थतज्ज्ञांसाठी चिंतनीय ठरावा. अर्थतज्ज्ञांनी सबुरीचे धोरण स्वीकारले तर बरे, असे रॉड्रिक यांना वाटते. खुल्या अर्थव्यवस्थेचा लांबचा टप्पा गाठण्याचा किंवा वेगाने त्याकडे जाण्याचा आग्रह त्यांनी धरायला नको. अर्थव्यवस्थेचा विकास करण्यासाठी उद्योजकांच्या मनात ठिणगी पडली पाहिजे. देशात उद्योजकतेची आच विझलेली किंवा मंदच असली तर खुल्या अर्थव्यवस्थेची ठिणगी त्यांना कितपत सहाय्यभूत ठरेल, अशी शंका त्यांनी व्यक्त केली आहे. कदाचित त्याचा परिणाम उलटही होऊ शकेल, अशी भीती आहे. उद्योजकांच्या पायाखालची जमीन एकदम बदलण्यापेक्षा त्यांना सहाय्यभूत ठरणारी धोरणे आखण्याचा प्रयत्न करण्यात आला, तर कदाचित खुल्या अर्थव्यवस्थेचा जास्त फायदा होऊ शकेल, असे मत ते व्यक्त करतात.

उद्योगांच्या व अर्थव्यवस्थेच्या विकासाची सुरूवात होणे ही एक बाब आहे आणि त्यात सातत्य असणे ही आणखी एक महत्त्वाची बाब आहे. १९८० च्या दशकात व त्यानंतर भारतीय अर्थव्यवस्था, उद्योजकांना जास्त संरक्षण देऊ शकली नसती आणि राजकीय नेत्यांचाही उद्योजकांप्रतीचा दृष्टिकोण हा शत्रुत्वाचा राहू शकला नसता, असेही त्यांना वाटते. सरकारी हस्तक्षेपाचीच सवय झालेल्या उद्योगांना, अचानक राजकीय नेत्यांनी जवळ करण्याचे धोरण अवलंबताच औद्योगिक वातावरण ढवळून निघाले. तद्वतच, लायसन्स व परमिट राज आणि संरक्षण यांमुळे सुप्त राहिलेल्या औद्योगिक क्षमता, १९९१ नंतर, जोरकसपणे उफाळून वर आल्या, असे रॉड्रिक यांना वाटते.

रॉड्रिक म्हणतात ते मान्य करायचे झाले तर, असे म्हणता येईल की, अर्थतज्ज्ञांनी वेगाने सुधारणा करण्याचा जो प्रयत्न केला, त्यामागे भारताच्या काही दशकांपासूनच्या वाया जात असलेल्या क्षमता, हेच कारण असावे.

*(संदर्भ - द इकॉनॉमिस्ट ,२९ मे २००४)*

# खुल्या व्यापाराचा गरीब समर्थक !

खुला व्यापार व जागतिकीकरण आणि त्याला होणारा विरोध या गेल्या काही वर्षांतील घटना. त्यातही खुल्या व्यापाराचे समर्थक म्हणजे श्रीमंत गटात मोडणारे आणि विरोधक हे गरीब गटात मोडणारे असे एक सर्वसाधारण चित्रही त्यातून पुढे आले. इतिहासात, १८४० च्या सुमारास, व्यापार खुला व्हावा यासाठी ब्रिटनमध्ये एक आंदोलन छेडले गेले होते; आणि तेही रिचर्ड कॉबडेन या गरीब व्यक्तीकडून ! ३ जून १८०४ रोजी रिचर्ड कॉबडेनचा जन्म ससेक्समधील एका गरीब शेतकरी कुटुंबात झाला. त्याचा कापडाचा (कॅलिको) व्यवसाय होता. रिचर्डने १८३९ ते १८४६ या काळात, ब्रिटनने गव्हाच्या आयातीवरील निर्बंध उठवावेत आणि किंमतींवरील नियंत्रण हटवावे यासाठी, मोठे आंदोलन उभे केले होते. किंमतींवरील नियंत्रण व आयातीतील अडथळे हे करसदृश असून त्यामुळे कमी दर्जाचे अन्नधान्य खाण्याची वेळ येते, असे तो म्हणत होता. 'अँटी कॉर्न लॉ लीग' ही त्या काळातील संघटना म्हणजे स्वेच्छाकार्य संस्थांच्या इतिहासातील कदाचित पहिलीच मोठी संघटना असावी. या नियंत्रणांमुळे, श्रमाची किंमत वाढणे, मागणी कमी होणे आणि ब्रिटनबरोबर व्यापार करण्याचे इतर देशांनी नाकारणे असे परिणाम होत असल्याचे, तसेच गरीब कामगारांची उपासमारच होत असल्याचे सांगून, त्याने, ब्रिटनच्या संसदेसमोर हा प्रश्न उपस्थित केला होता. १८४५ मध्ये दुष्काळ (आयरिश फेमिन) पडल्यानंतर ब्रिटनच्या सरकारने कॉबडेनचे म्हणणे ऐकून घेतले व त्यानंतर तत्कालीन पंतप्रधान सर रॉबर्ट पील यांनी त्यासंबंधी काही सुधारणा अंमलात आणल्या. कॉबडेनच्या म्हणण्याचा परिणाम पहिल्या महायुद्धापर्यंत टिकून होता. महत्त्वाचे म्हणजे कॉबडेनच्या या आंदोलनात तो स्वतः मात्र कफल्लक झाला. पण खुल्या व्यापारामुळे गरिबांचा फायदा होईल असे त्याला वाटत होते म्हणून त्याने हे सर्व सहन केले. या सर्व घटना घडत असताना, एकीकडे, त्याचा कापडाचा व्यवसाय अगदी खुल्या व्यापाराशिवायही वाढत होता. मात्र हा हेतू धरून त्याने आंदोलन छेडले नव्हते. आजही जगात युरोपीय देश, जपान, अमेरिका व अनेक विकसनशील देशांमध्ये अन्नधान्यावर कर आहे, आणि नागरिकांनाच या कराचा बोजा सहन करावा लागतो. त्यावर अर्थातच 'अन्नधान्यांवरील कर रद्द करा,' हे कॉबडेनचे उत्तर तयार आहे. *(संदर्भ - द इकॉनॉमिस्ट, ५ जून २००४)* ■■

सामाजिक

# मलेशियातील मुस्लिमेतर नागरिक इस्लामच्या कायद्यात ?

मलेशिया हा बहुसंख्य मुस्लिम (मलय) नागरिक असलेला देश आहे. शिवाय येथे सुमारे ३३ टक्के चिनी नागरिक व उर्वरित भारतीय आहेत. काही इतर धर्मीय नागरिक येथे आहेत. अलीकडेच येथे या मुस्लिमेतर समाजाबाबत काही घटना घडल्या. तेथील कौटुंबिक व सामाजिक परिस्थितीचे दर्शन घडविणाऱ्या या घटना, कायद्याच्या व धर्माच्या दृष्टीने विचार कराव्यात, अशा आहेत. (भारतातही शाहबानो खटला गाजला होताच.)

मलेशियात वास्तव्यास असणारे श्यामला सत्यशीलन आणि जयगणेश मोगराजा यांचा विवाह १९९८ मध्ये झाला. ते दोघेही तेव्हा हिंदू होते. त्यांना दोन मुले आहेत. पण त्यांचे लग्न टिकले नाही. दरम्यान, जयगणेशने पत्नीला न सांगता आपल्या मुलांसह इस्लाम धर्म स्वीकारला आणि श्यामला हिंदूच राहिली. आपल्याला न विचारता त्याने मुलांचे धर्मांतर केले म्हणून ते बेकायदेशीर मानावे, असे श्यामलाचे म्हणणे आहे. अखेरीस यावर मार्ग काढण्यासाठी श्यामला न्यायालयात गेली. आता तिचा खटला एका महत्त्वाच्या टप्प्यावर येऊन थांबला आहे.

१४ एप्रिल २००४ रोजी न्यायाधीश फैजा तांबी चिक यांनी असा निर्णय दिला की, 'ही बाब न्यायालयाच्या अखत्यारीतील नाही. मलेशियातील शरिया न्यायालयाने यावर निर्णय द्यावा.' येथे श्यामला अडचणीत आली. कारण, मलेशियातील कायद्याप्रमाणे बिगर मुस्लिम नागरिकांना शरियासमोर उभे राहण्याचा हक्कच नाही. सध्या हा खटला धर्माशी संबंधित नसलेल्या साधारण न्यायालयात आहे. पण श्यामलाने आता आपला निर्णय घेतला व तिने मुलांसह मलेशियाच सोडले. आता ती कुठे आहे हे कुणालाच माहिती नाही.

मलेशियाच्या राज्यघटनेने सर्व नागरिकांना धार्मिक स्वातंत्र्य दिले असले तरी इस्लामच्या संदर्भात कोणतेही निर्णय घेण्याबाबत येथील न्यायालयाने उदासीनता दर्शविली आहे. त्यामुळे श्यामलासारख्या नागरिकांनी कुठे दाद मागायची ? असा प्रश्न निर्माण झाला आहे. ही घटना तेथे काळजीची झाली आहे; कारण, 'सर्वांसाठी समानता' या

मूलभूत तत्त्वावर तिचा घाला पडला आहे, आणि मुस्लिमांचे अधिकार वरच्या पातळीवर आहेत, असे यातून स्पष्ट झाले आहे, असे श्यामलाचे वकील शिवरास रासिया यांनी म्हटले आहे.

मलेशियाला १९५७ मध्ये स्वातंत्र्य मिळाले; त्यानंतरच्या दशकात मलेशियाच्या सरकारने, इस्लामशी संबंधित कायदेशीर बाजू अतिशय चांगल्या पद्धतीने हाताळल्या. अगदी 'इस्लामचा त्याग करणे' या, मुस्लिमांना न पटणाऱ्या बाबीवरूनही तेथे गोंधळ झाला नाही. मलेशियाच्या स्वातंत्र्यापूर्वी मात्र अशी घटना घडली, तेव्हा तेथे जातीय दंगल झाली होती. १९५० मध्ये मलेशियावर ब्रिटिशांचा अंमल होता तेव्हा, मलय नागरिकाने दत्तक घेतलेल्या, पण जन्माने डच असणाऱ्या मारिया हर्टोग या मुलाला, ब्रिटिशांनी नेदरलँडस् येथे परत पाठविले होते. असे असले तरी १९८० पर्यंत इस्लाम धर्म स्वीकारून नंतर तो नाकारणे हे कठीण नव्हते. शपथपत्र घेऊन धर्मत्याग करता येत होता. मात्र नंतर हे कठीण झाले. कारण, १९८८ मध्ये, तत्कालीन पंतप्रधान महाथीर मोहम्मद यांनी घटनात्मक दुरूस्ती करून इस्लामशी संबंधित घटनांचा समावेश शरिया न्यायालयाच्या अखत्यारीत केला. आज, धर्मत्याग केल्यास तेथे तुरुंगात जावे लागते.

या दुरुस्तीचा परिणाम असा झाली की, कौटुंबिक बाबींमध्ये इस्लामचे स्थान वरचढ ठरले आणि मलेशियातील धर्मनिरपेक्ष न्यायव्यवस्था अशा बाबींसंबंधी अलिप्तता दर्शवू लागली. मलेशियातील राजकीय पक्षाची इस्लामच्या प्रती असलेली बांधिलकी लक्षात घेता, न्यायव्यवस्थेचे अलिप्त असणे हे समजून घेता येते, असे काही वकिलांचे म्हणणे आहे. आजही इस्लामच्या अशा बाबींवरून तेथे गोंधळ होऊ शकतो. उदाहरणार्थ, १९९८ मधील एक घटना होय. नुर-ऐ-शाह बोखारी या मलय मुस्लिम युवकाने चिनी-भारतीय वंशांच्या जोसेफ ली या कॅथॉलिक युवतीशी विवाह करून कॅथॉलिक होणे मान्य केले, तेव्हा असेच वादळ निर्माण झाले होते. अखेरीस, या नवदाम्पत्याला मलेशिया सोडून पळून जावे लागले. आजही ते मलेशियाला परतण्याचा विचार करू शकत नाहीत. श्यामलाला जर या धर्मनिरपेक्ष न्यायालयात दाद मागायची असेल तर मलेशियाच्या सरकारने घटनादुरुस्ती करून तिला न्याय मागायचा हक्क मंजूर करून दिला पाहिजे, असे न्यायाधीशांचे म्हणणे आहे. हे होणे कठीणच आहे. म्हणूनच श्यामलाने मलेशिया सोडण्याचा निर्णय घेतला असावा, असे स्त्रियांना मदत करणाऱ्या संघटनेच्या संचालिका आयव्ही जोसिया म्हणतात. अशा घटना येथे घडतच राहणार असेही त्यांना वाटते. *(संदर्भ - फार ईस्टर्न इकॉनॉमिक रिव्ह्यू, २७ मे २००४)* ■■

सांस्कृतिक

# साम्यवादी चीनच्या भूमीवर धर्म अंकुरतोय !

अलीकडे, गेल्या चार -पाच वर्षांत, चीनमधील आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक वातावरण थोडे थोडे बदलू लागले आहे. नव्या शतकात, जगाशी संबंध जोडताना चीन जरासा 'मोकळा' होऊ लागला आहे; आणि याचे पडसाद 'धर्म' क्षेत्रातही उमटताहेत.

साम्यवादी विचारसरणीने, 'धर्म -पंथ (उपासनापद्धती) मोडीत निघू शकते' किंवा 'धर्म ही अफूची गोळी आहे,' असे म्हणून ठेवले आहे. त्यामुळे चीनच्या राजकीय व सामाजिक जीवनात धर्म कधी डोकावला नाही. वैयक्तिक पातळीवर धर्माचा कोणी व कसा उपयोग केला, हे कधी चीनने जाणून घेण्याचा प्रयत्न केला नाही वा तेथे ते फारसे समजून आले नाही. शिक्षणातही कधी धर्माला स्थान देण्यात आले नाही. आजही, चीनमध्ये प्राथमिक, माध्यमिक व उच्च शालेय शिक्षणात 'धर्म' शिकविला जात नाही. धर्म हा आपला प्रांतच नव्हे, असे चीनने ठरविल्याचे दिसते. तरीही एक खबरदारीची उपाययोजना म्हणून माओच्या काळात धर्म दडपण्याचा प्रयत्न झाला. माओनंतरच्या काळातही चीनमधील नेतृत्वाने शिक्षण देणे, गरिबी दूर करणे आणि आताच्या काळात आर्थिक सुधारणा करणे यावरच भर दिला. (म्हणूनच की काय, चीनमधील गरिबी बऱ्याच प्रमाणात कमी झाली आहे. जागतिक बँकेनेही हे मान्य केले आहे. तसेच तेथे साक्षरतेचे प्रमाणही जास्तच आहे.) अलीकडे मात्र येथे काही वेगळ्या घडामोडी घडताहेत. बौद्ध व कन्फ्युशियन धर्म हे चीनमधील नागरिकांचे प्रमुख धर्म आहेत. आता, बौद्धांसह मुस्लिम व ख्रिश्चन धर्मियांच्या श्रद्धा येथे वाढू लागल्या आहेत.

चीनच्या उत्तर व मध्य भागात, (मंगोलियाच्या दक्षिणेला) निंगझिया, टोंगझिन आणि होंग गांझी येथे 'हुई' नावाचा मुस्लिम समाज आहे. बौद्ध धर्मीयांनंतर, चीनमध्ये सर्वात मोठा अल्पसंख्याक गट हा हुई मुस्लिम समाज आहे. सातव्या शतकात, पर्शियन व अरब येथे आले. हळूहळू ते येथे स्थिरावले आणि येथील स्थानिक स्त्रियांबरोबर ते विवाह करू लागले. त्यामुळे या नागरिकांची चेहेरेपट्टी चिनी वंशीयांशी जुळणारी आहे आणि त्यांचा धर्म मात्र मुस्लिम आहे. चीनमध्ये धर्मविषयक आकडेवारी फारशी उपलब्ध होते असे नाही; तरी अंदाजे दोन कोटी मुस्लिम नागरिक व एक -दीड कोटी ख्रिश्चन नागरिक येथे आहेत, असे समजते.

चीनमधील साम्यवादाने धर्माला थोडी मोकळीक देतानाही काही अधिकार आपल्याकडे राखून ठेवले आहेत. उदाहरणार्थ, चीनमध्ये धर्मांतराला बंदी आहे.

चीनमध्ये आज किमान १२१ चर्चेस् आणि ७३ ख्रिस्ती धर्मगुरू व ९८ नन्स् आहेत; आणि ख्रिस्ती धर्मगुरू नेमण्यासाठी चीनमध्ये 'कॅथॉलिक पॅट्रियाटिक असोसिएशन' आहे. ख्रिश्चन धर्माचे कार्य, जे व्हॅटिकन येथून होते, त्या व्हॅटिकनचे व चीनचे राजकीय संबंध नाहीत. शिवाय, चीनमधील ख्रिस्ती धर्मगुरूची नेमणूकही व्हॅटिकन येथून होत नाही. बिशप अलॉयशियस जिन लुक्झियान (वय ८८) यांनी हे सरकारी नियंत्रणातून मिळालेले बिशपपद मान्य केले आहे. गंमत म्हणजे, व्हॅटिकनने अशा प्रकाराबाबत व विशेषतः जिन यांच्या संदर्भात फारशी चर्चा वा विरोध केलेला नाही. कारण, चीनमधील कॅथॉलिसिझमच्या भवितव्याबाबत, जिन यांच्या चीनच्या नेतृत्वाबरोबर होणाऱ्या चर्चा महत्त्वाच्या ठरणार आहेत. सध्या चीनमधील सर्वात मोठ्या चर्चमध्ये, शांघाय येथील क्जुजियाहुई कॅथेड्रलमध्ये, नूतनीकरणाच्या योजना कार्यान्वित झाल्या आहेत. असे करताना जिन यांच्या मार्गदर्शनाखाली ख्रिश्चन धर्माला चिनी कोंदणात बसविण्याचाही प्रयत्न होतो आहे. उदाहरणार्थ, पाश्चात्य देशांत, ख्रिस्ताची माता मेरीच्या हातात, पांढरेशुभ्र लिलीचे फूल दर्शविले जाते; तर चीनमध्ये कमळाच्या फुलाचा चीनमध्ये असलेला संदर्भ लक्षात घेऊन कमळाचे फूल दर्शविण्यात येणार आहे.

मुस्लिम धर्माबाबतही असेच काहीसे घडते आहे. "पूर्वी येथे धार्मिक स्वातंत्र्य ही फक्त कागदोपत्री असणारी बाब होती, आता जोपर्यंत आम्ही राजकीय दृष्टीने पक्षाशी एकनिष्ठ आहोत, तोवर आम्हाला धर्माशी संबंधित काही गोष्टी मोकळेपणाने करता येतात," असे मत होंग यांग या मुस्लिम धर्मगुरूने व्यक्त केले आहे. होंग यांग यांचे मत महत्त्वाचे आहे. कारण, चीनमध्ये, मुस्लिम धर्मगुरू होण्याची परवानगी कोणाला द्यायची हा निर्णय सरकार घेत असते. चीनच्या पश्चिमेकडील उइघुर प्रांतातील मुस्लिम नागरिक हे फुटीरतावादी समजले जातात, तसे या नागरिकांबाबत नाही. होंग यांचा पंथ सूफी इस्लाम असून त्यांच्या वाडवडिलांकडून त्यांना हा वारसा मिळाला आहे. चीनच्या नियमांच्या अंतर्गत मुस्लिम धर्म जपणाऱ्या होंग यांची धार्मिक निष्ठा कधी-कधी उफाळून येते आणि साम्यवादी सरकार धर्माला फार पुढे जाऊ देईल किंवा कसे यावर ते काळजी व्यक्त करतात. एकंदरीत चीनमध्ये धर्म ही बाब आता निषिद्ध मानली जात नाही, असे दिसते.

*(संदर्भ - फार ईस्टर्न इकॉनॉमिक रिव्ह्यू , न्यूयॉर्क टाइम्स, इंटरनेट )* ■■

# औद्योगिक जागतिकीकरण व कामगार संघटना

एकेकाळी औद्योगिक क्षेत्र गाजविणाऱ्या कामगार संघटनांचा आवाज आज, जागतिकीकरणाच्या गदारोळात दबला गेल्याचे दिसते. जागतिकीकरण, भांडवलशाही आणि मुक्त व्यापार या बाबी अटळ आहेत, असे समजून त्यांचा स्वीकार या संघटनांनी केला आहे का ? की त्यांचा याला विरोध आहे ? विरोध असेल तर या संघटना कोणती कृती करीत आहेत ? त्यांची वैचारिक भूमिका काय आहे ? या प्रश्नांच्या संदर्भात युरोपमधील कामगार संघटनांबाबतचा एक अभ्यासपूर्ण लेख 'मंथली रिव्ह्यू'ने प्रसिद्ध केला आहे. (कदाचित भारताच्या संदर्भातही ते विचार ताडून पाहता येतील.)

जागतिकीकरणाच्या संदर्भात, युरोपमधील कामगार संघटना सैद्धांतिक व राजकीय संकटात सापडल्या आहेत. संघटनेच्या सभासदांची, जागतिकीकरण व मुक्त व्यापारामुळे होणारी, आर्थिक व सामाजिक हानी रोखण्याबाबत संघटना अयशस्वी ठरल्या असून त्यांनी बचावात्मक धोरण अंगिकारलेले दिसते. उद्योगासह इतर सर्व क्षेत्रांत त्या पिछाडीवर आहेत. दुसऱ्या महायुद्धानंतरच्या भांडवलशाही जगात खूप प्रभावशाली असलेल्या कामगार संघटना आज गोंधळलेल्या आहेत. त्यांच्या काळात ज्या सिद्धांतांनी, सखोल अभ्यासांनी आणि त्याअनुषंगिक धोरणांनी त्यांना बळकटी दिली, तीच धोरणे आता त्यांना जड जात आहेत. ज्या सामाजिक कराराचा (शांततापूर्ण मार्गाने प्रश्न सोडविण्याचा) तात्त्विक/वैचारिक वारसा त्यांना मिळाला होता, तो आता त्यांना वेगळ्या मार्गाला नेतो आहे, असे दिसते.

दुसऱ्या महायुद्धानंतरच्या काळात, आर्थिक व औद्योगिक विकास होण्यासाठी कामगार, मालक व शासन यांच्यात शांततापूर्ण सहकार्याची गरज आहे, असे सर्वांच्याच लक्षात आले. मग विविध घटकांमध्ये सामंजस्य असावे यासाठी सामाजिक करार पुढे आला; कल्याणकारी राज्याचा विचार रुजला. यानुसार कामगार वर्गाचे सर्व प्रकारचे हित जपून (वेतन वाढ, प्रशिक्षण, आरोग्य, कामगारांच्या मुलांचे शिक्षण, कामगारांना देण्यात येणारा नफ्यातील हिस्सा इ.) मालकवर्ग आपली धोरणे पुढे राबवील आणि कामगारवर्ग आपली उत्पादनक्षमता वाढवून व संप आणि तत्सम बाबी टाळून सहकार्याच्या धोरणाचा अवलंब करून नफा वाढविण्याचा प्रयत्न करील, असे ठरविण्यात आले.

या सामाजिक करारासाठी कामगारवर्गाची संघटित शक्तीच कारणीभूत ठरली होती. कामगार व कामगार संघटनांना डावलून आपण पुढे जाऊ शकत नाही, हे उद्योगपतींच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी परस्परसहकार्याचे धोरण स्वीकारले. ते बरीच वर्षे यशस्वी झाले. याच काळात, कामगार संघटना, औद्योगिक संस्था आणि शासन यांच्यात चर्चा घडवून आणणारा असा एक गटच निर्माण झाला होता, जणू कामगार संघटनांमधील ती 'नोकरशाही'च होती.

## परिस्थिती नवी व धोरणे जुनी

१९७०च्या दशकात पाश्चिमात्य देशांतील भांडवलशाही संकटात सापडली आणि खर्च कमी करण्यासाठी भांडवलशाहीच्या समर्थकांनी 'सहकार्या'च्या भूमिकेकडे पाठ फिरवली. संघटित कामगारवर्गाविरूद्ध त्यांची धोरणे जाऊ लागली. या काळात, शांततापूर्ण चर्चेला सरावलेल्या कामगार संघटना (व त्यांच्यातील नोकरशाही) मात्र संघर्षासाठी तयार नव्हत्या. भांडवलशाहीच्या समर्थकांच्या बदललेल्या धोरणाला काय व कसे प्रत्युत्तर द्यायचे, याच्या गोंधळात त्या होत्या. कामगार संघटनांच्या सध्याच्या अशा गोंधळलेल्या स्थितीला, आक्रमक झालेली भांडवलशाही व नवआर्थिकवाद जबाबदार ठरला आहे. अशा परिस्थितीत आपले 'सहकार्या'चे धोरणच संघटनांनी राबविले. या धोरणातून त्यांचा फायदा झाला, असेही नाही. तरी त्यांना दुसरा मार्ग उपलब्ध नव्हता. कारण, भांडवलशाहीच्या समर्थकांनी आंतरराष्ट्रीय संस्थांना पुढे करून चर्चेची दिशाच बदलली. आणि कामगारवर्गाचे हित जपण्यात अयशस्वी ठरलेल्या संघटनांना कामगारच सोडून जाऊ लागले. १९८० च्या दशकात कामगार संघटनांना असा धक्का बसला. विसाव्या शतकात, कामगारांना महत्त्व देणारी आर्थिक व सामाजिक व्यवस्था आता शतकाअखेरीस भांडवलाला महत्त्व देत असल्याचे स्पष्ट झाले. लक्षात घेण्यासारखी गोष्ट अशी की, बहुराष्ट्रीय कंपन्या या बदलांमध्ये मोठी भूमिका बजावत आहेत.

आपल्या धोरणांना संस्थात्मक बळकटी आणण्यासाठी भांडवलशाहीकडे झुकणाऱ्या गटाने, जागतिक व्यापारी संघटना व इतर आंतरराष्ट्रीय संघटनांच्या निर्मितीस मदत केली. या आंतरराष्ट्रीय संघटना, कल्याणकारी लोकशाही शासनाच्या तुलनेत, लोकशाहीशी संबंधित मूल्यांना, तत्त्वांना कमी महत्त्व देणाऱ्या असल्याने व भांडवलशाहीचे हित जपणाऱ्या असल्याने त्या भांडवलशाहीचे एक प्रभावी साधन ठरल्या. आता, नव्या शतकात 'युरोपियन युनियन' (युरोपमधील काही देशांनी एकत्र येऊन 'युरोपियन

युनियन' स्थापन केले. अलीकडे मे २००४मध्ये 'युरोपियन युनियन'मध्ये सोव्हिएट रशियातून बाहेर पडलेल्या आणखी काही राष्ट्रांनी प्रवेश केला आहे. युरोपियन युनियन अंतर्गत राष्ट्रांची संख्या आता पंचवीस झाली आहे.) हे आणखी एक प्रभावी साधन या भांडवलशाहीच्या समर्थकांच्या हाती आले आहे. कारण, आता, युरोपमधील ज्या देशांमध्ये, श्रमाचा मोबदला जास्त आहे, तेथील काम हे, युरोपमधीलच इतर देशांमध्ये, श्रमाचा मोबदला कमी असलेल्या ठिकाणी, जाऊ शकेल, असेही म्हटले जात आहे. या सर्व संस्थांचा हा मार्ग बदलण्यासाठी कामगार चळवळीला, कामगारांची-कर्मचाऱ्यांची शक्ती पुन्हा एकदा एकवटावी लागणार आहे.

युरोपमधील कामगार संघटना, सध्यातरी, कामगार व कर्मचाऱ्यांना एकत्र करण्याचे उद्दिष्ट ठेवून कार्य करताना दिसत नाहीत. त्यातच युरोपमधील सध्याची एकूणच आर्थिक व राजकीय परिस्थिती बऱ्याच प्रमाणात बदलली आहे; आणि कामगार संघटना आजही पूर्वीच्या सामाजिक कराराच्या मार्गानेच जात आहेत. 'नव्या परिस्थितीत नवी धोरणे' हे तत्त्व कामगार संघटनांनी हिरीरीने पुढे आणलेलेच नाही. जागतिकीकरण, मुक्त व्यापार व त्या अनुषंगाने निर्माण झालेले प्रश्न हे, सत्तेची नवी समीकरणे वा वर्गलढ्याचा एक भाग नाही. तर, तंत्रज्ञानाचा विकास व औद्योगिक क्षेत्रातील बदल याचा तो एक अटळ परिणाम आहे, असे या कामगार संघटना मानतात. ब्रिटनच्या माजी प्रधानमंत्री मार्गारेट थॅचर यांनी यासंदर्भात, 'याला पर्याय नाही,' ('देअर इज नो अल्टरनेटिव्ह -TINA') असे म्हटले होते. तसेच या संघटनांनाही वाटते. फक्त राष्ट्रीय पातळीवरील सामाजिक कराराचा संदर्भ विस्तारून तो प्रादेशिक व जागतिक पातळीवर नेला पाहिजे, असे त्यांना वाटते. यासाठी कामगार संघटनांमध्ये चर्चेसाठी तयार झालेली फळी पुन्हा पुढाकार घेण्याचा प्रयत्न करीत आहे, असे दिसते.

भांडवलशाहीच्या समर्थक संस्था, उदाहरणार्थ, 'वर्ल्ड इकॉनॉमिक फोरम' किंवा 'जागतिक व्यापार संघटना' यांच्यासारखीच पण, कामगारांचे समर्थन करणारी अशी 'वर्ल्ड सोशल फोरम' ही संस्था आता उभी राहिली आहे. (काही कामगार संघटना मात्र या फोरममध्ये सहभागी झालेल्या नाहीत.) या फोरममध्ये चर्चा करून प्रश्न सोडविण्याचा मुद्दा मांडला गेला होता. पण एक महत्त्वाचे असे की, बदललेल्या आर्थिक व सामाजिक परिस्थितीत, पूर्वी जसा चर्चांमधून प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न होत असे, तसा आता होईलच असे नाही. आणि असे घडल्याचा अनुभवही आला आहे. युरोपमध्ये या धोरणामुळे कामगार संघटनांचे कार्य ठप्प झाले आहे.

## कामगार संघटनांची दिशा

आता भविष्यकाळात या कामगार संघटनांनी काय करायला हवे आहे; तर, भांडवलशाही समर्थक धोरणांच्या विरोधांत समोरासमोर उभे ठाकले पाहिजे. कामगार संघटनांचे हरवलेले स्थान पुन्हा मिळविण्याची गरज निर्माण झाली आहे. स्थानिक, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर कामगार संघटनांच्या भूमिकेबाबत उमटलेले प्रश्नचिन्ह मिटविण्याची व संघटनेचे महत्त्व सर्वांना जाणवून देण्यासाठी सर्व कामगारांनी एकत्र येण्याची वेळ आलेली आहे. बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या विरोधात एकत्र येण्यासाठी समान उद्योगातील कामगारांना परस्परांना सहकार्य करावे लागणार आहे. 'आमची कंपनी' व 'तुमची कंपनी' अशी भूमिका सोडून सर्व कामगारांच्या एकत्रित हिताचा विचार संघटनांना करावा लागणार आहे. कंपन्यांमध्ये आपापसात स्पर्धा असली तरी कामगारांचे एकत्र असणे हे यापुढे महत्त्वाचे ठरणार आहे.

कामगार संघटनांनी आणखी एक महत्त्वाचे काम करायला हवे आहे; ते म्हणजे, खाजगीकरणाला विरोध हे होय. सार्वजनिक सेवाक्षेत्रांत होत असलेले खाजगीकरण व मोठ्या कंपन्यांचा विविध क्षेत्रांमध्ये होणारा विस्तार रोखण्याचे काम कामगार संघटनांनी करायला हवे आहे. समानता, लोकशाहीची मूल्ये या मार्गावरून जाऊन कामगारांचा हरवलेला विश्वास त्यांना परत मिळवून देणे गरजेचे झालेले आहे. 'सामाजिक करारा'च्या काळात, कामगार संघटनांमध्ये चर्चा करण्यासाठी स्थिरावलेली नोकरशाही रद्दबादल ठरवून त्याऐवजी पर्याय शोधण्याचे काम आता व्हायला हवे आहे. बदलत्या परिस्थितीत, कामगार संघटनांना बळकट व्हायचे असेल तर, याला पर्याय नाही. मात्र अभ्यासकांनी, सर्व कामगारांना आपली पूर्वीची भूमिका बदलण्याची वेळ का आलेली आहे, हेही सोदाहरण समजावून सांगितले पाहिजे. आर्थिक, औद्योगिक व सामाजिक विकासासाठी करण्यात आलेला 'सामाजिक करार' ही तत्कालीन इतिहासाची गरज होती, कामगार संघटनांचे ते उद्दिष्ट नव्हते; हे स्पष्ट करण्याची हीच वेळ आहे. आणि तो मोडीत काढणे ही वर्तमानाची गरज आहे. हे जागतिक पातळीवर व्हायला हवे आहे. *(संदर्भ - इंटरनेट, 'मंथली रिव्ह्यू' -जानेवारी २००४ मधील, अस्बजोर्न वल यांचा 'युरोपियन लेबर: द आयडिऑलॉजिकल लिगसी ऑफ द सोशल पॅक्ट' हा लेख आणि त्यांचेच 'युरोपियन सोशल फोरम' मध्ये झालेले 'ट्रेड युनियन स्ट्रॅटेजी अगेन्स्ट कॉर्पोरेट युरोप' हे भाषण. अस्बजोर्न वल हे कामगार संघटनांमध्ये सक्रीय असून या विषयाचे अभ्यासक आहेत.)* ■■

सामाजिक

# नव्या शतकात वाचन हरवले ?

टेलिव्हिजन, कम्प्युटर व इंटरनेटच्या या युगात पुस्तके व वाचनसंस्कृती मागे पडते आहे काय, अशी शंका विचारवंत नेहमीच उपस्थित करीत असतात. जगभरात, अमेरिकेपासून जपानपर्यंत हा विषय चर्चिला जाताना आढळतो. भारतातही अशी चर्चा बरेचदा होताना दिसते. कदाचित, जागतिकीकरणामुळे होत असणाऱ्या सामाजिक व आर्थिक बदलांचा परिणाम वाचनावरही होत असावा. या पार्श्वभूमीवर, यासंदर्भात, जगभरात आणि विशेषतः जपानमध्ये, वाचनसंस्कृती हरवताना दिसते किंवा कसे या विषयावर, जपानमधील योशिमी शून्या या अभ्यासकाने व्यक्त केलेले विचार जाणून घेणे उपयुक्त ठरावे.

देशादेशांमध्ये वाचनाचे प्रमाण वाढणे वा कमी होण्याचे प्रमाण वेगवेगळे आहे. काही देशांमध्ये वाचनाचे प्रमाण वाढलेले दिसते, तर काही देशांमध्ये ते कमी झाले आहे. काही देशांमध्ये तर कित्येक वर्षांत वाचनाचे प्रमाण 'जैसे थे' राहिले आहे. वेगवेगळ्या देशांतील वेगवेगळ्या सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय व आर्थिक घटनांचा परिणाम वाचनावर होत असतो. तेव्हा, जागतिक पातळीवर पुस्तक वाचनाचे प्रमाण कमी झाले वा वाढले असा निष्कर्ष काढणे फारसे योग्य ठरणार नाही. मात्र, गेल्या दोन दशकांपासून जपानमध्ये, पुस्तके वाचणाऱ्या तरुणांच्या संख्येत बरीच घसरण झाली आहे, असे अलीकडेच केलेल्या एका पाहणीत आढळले आहे. उच्च शालेय शिक्षण घेणारे विद्यार्थीही याच गटात मोडतात. कम्प्युटर, व्हिडिओ गेम्स आणि इंटरनेट यांच्यामुळे पुस्तके मागे पडली, हे काही प्रमाणात खरेच आहे. लहान व मोठी मुले या माध्यमांकडे आकर्षित तर होतातच; शिवाय काही अभ्यासकही या माध्यमांकडे वळले आहेत. संपूर्ण समाजच छापील माध्यमाकडून 'डिजिटल'कडे वळतो आहे की काय, अशा शंका निर्माण होणे आता स्वाभाविक ठरते आहे. केवळ जपानमध्येच असे घडते आहे असे नाही; अमेरिकेतही असेच घडते आहे. अमेरिकेतील बहुसंख्य मुले टेलिव्हिजनसमोर आपला वेळ घालवितात. १९२० पासून अमेरिकेतील मुलांचे वाचन मोठ्या प्रमाणात वाढलेले दिसत नाही. काही लोकांनी या निष्कर्षाला आक्षेप घेतले आहेत. याला अमेरिकेतील श्रीमंतीचे व गरिबीचे परिमाणही आहे, असे म्हटले जाते.

चीनमध्ये मात्र जरा वेगळे घडले आहे. साम्यवादी राजवटीमुळे चीनमध्ये, वैचारिक स्वातंत्र्य नव्हते. आता चीनने काही नवीन धोरणे आखल्याने प्रकाशन व्यवसायात उत्साहाचे वातावरण असून अनेकविध विषयांवर पुस्तके उपलब्ध होत आहेत. त्यामुळे येथे टेलिव्हिजन व व्हिडिओ गेम्स असले तरी वाचनाकडे युवकांचा कल वाढताना दिसतो. वाचनाच्या संदर्भात, जपानमध्ये, सर्व नागरिकांमध्ये पसरलेली एक सार्वजनिक वाचन संस्कृती आत्तापर्यंत होती. म्हणजे असे की, जपानच्या सांस्कृतिक जडण-घडणीमुळे जपानमध्ये, बुद्धिवादी लेखकांच्या विविध कल्पनांचे स्वागत वाचकांकडून केले जात होते. त्यामुळे तेथे देशांतर्गत वाचकवर्ग संख्येने मोठा होता आणि प्रकाशनसंस्थांचे आर्थिक स्थैर्यही टिकून होते. आता, जागतिकीकरणामुळे आणि इंटरनेट व डिजिटल क्रांतीमुळे संवादाचे प्रभावी माध्यम असलेल्या पुस्तकांचे विश्व, म्हणजे सार्वजनिक वाचनसंस्कृती मुळापासून हादरली आहे की काय, अशी शंका व्यक्त करण्यात येत आहे. जपानमधील वाचकवर्ग संख्येने थोडा कमी झाला आहे ही एक बाब झाली. दुसरी बाब अशी की, वैचारिक व तात्त्विक विषय वाचणाऱ्यांचीही संख्या रोडावलेली दिसते. पूर्वी व्यावसायिक पुस्तके प्रसिद्ध करणाऱ्यांनाही गंभीर वाद-चर्चा आवडणारे वाचक मिळत असत, आता तसे होत नाही. वृत्तपत्रे व वैचारिक नियतकालिके यांचे वाचन करणारा युवावर्ग आता कमी झाल्याचे आढळते. अशा परिस्थितीत जपानमधील आतापर्यंत अस्तित्वात असलेली सार्वजनिक वाचन संस्कृती टिकवायची व वाढवायची कशी, हा येथील सामाजिक प्रश्न आहे. वाचन कमी होण्याचा आणखी एक परिणाम असा की संस्कृती, (वैचारिक चर्चा-वाद) व व्यापार (पुस्तक प्रकाशन संस्थांचा व्यवहार) यांच्यातील परस्परसंबंध कमी झाला आहे.

सार्वजनिक वाचन संस्कृती कमी झाली असली तरी इंटरनेट व डिजिटल माध्यमे वापरणाऱ्या व त्याद्वारे वैचारिकता जपणाऱ्या नागरिकांची संख्या जर वाढली असेल तर, सार्वजनिक वाचन संस्कृती वेगळ्या मार्गांनी टिकून राहील, असा आशावाद करता येईल. तसेच शाळा, ग्रंथालये, पुस्तकांची दुकाने आणि स्वेच्छाकार्य संस्था यांनाही यासंदर्भात काय करता येईल याचा विचार व्हायला हवा. वैयक्तिक वाचन कमी झाले तरी सार्वजनिक वाचन संस्कृती वाढविण्यासाठी विविध मार्गांनी प्रयत्न होणे गरजेचे आहे. *(संदर्भ - इंटरनेट, योशिमी शून्या यांचा 'व्हॉट हॅज हॅपन्ड टू रीडिंग ?' हा लेख. योशिमी शून्या टोकियो विद्यापीठाच्या 'सोशल इन्फर्मेशन रिसर्च इन्स्टिट्यूट' मध्ये 'सोशॉलॉजी व कल्चरल स्टडीज' या विषयाचे असिस्टंट प्रोफेसर आहेत.)* ■■

आर्थिक

# जागतिकीकरणामुळे अमेरिकेतील नागरिक अडचणीत ?

जागतिकीकरण व खुली अर्थव्यवस्था हे विषय पूर्वेपासून पश्चिमपर्यंत अनेक देशांमध्ये वादग्रस्त ठरताहेत. जागतिकीकरणासंदर्भात सध्या सर्वात जास्त गाजत असलेला विषय आहे 'आऊटसोर्सिंग'चा. 'आऊटसोर्सिंग' म्हणजे उत्पादक कंपन्या काही कामे आपल्या देशात न करता ती कामे इतर देशांमधून करवून घेऊ शकतात, ही सोय होय. 'आऊटसोर्सिंग' करण्यासाठी उत्पादक कंपनीला आपल्या देशात योग्य कुशल वा अकुशल कर्मचारी न मिळणे, संबंधित सोयी-सुविधा उपलब्ध नसणे, श्रमाचा द्यावा लागणारा मोबदला जास्त असणे, अशी काही कारणे असू शकतात. अशा कारणांमुळे भारत, चीन, फिलीपिन्स या व इतर काही देशांकडे अमेरिकेतील नोकऱ्या गेल्या आहेत. याचा परिणाम म्हणून आऊटसोर्सिंगमुळे अमेरिकेतील अनेक नागरिकांच्या नोकऱ्यांवर गदा आली असून ते अडचणीत आले आहेत, असे म्हटले जात आहे. (पाहा - 'अर्थबोधपत्रिका,' फेब्रुवारी २००४ मधील 'अमेरिकेतील बेरोजगारी व भारतातील रोजगारी' हा लेख.) त्यामुळे एकेकाळी जागतिकीकरणाचे समर्थक असलेले अमेरिकेतील नागरिक आता जागतिकीकरणाच्या वाईट परिणामांना सामोरे जात आहेत, म्हणून या आऊटसोर्सिंगला व काही प्रमाणात जागतिकीकरणाला तेथे विरोध होत आहे.

आऊटसोर्सिंगचे समर्थक मात्र इतर देशांमधील स्वस्त श्रमांचा उपयोग करून खर्च वाचविता आल्याने व पर्यायाने नफा वाढल्याने, त्यापासून ढळलेले नाहीत. आधुनिक तंत्रज्ञान वापरून, उत्पादकता वाढून नफा वाढतो, त्याप्रमाणेच हे आहे, असे त्यांचे म्हणणे आहे. (आणि नफा वाढविणारी कोणतीही बाब ही अमेरिकेच्या अर्थव्यवस्थेसाठी चांगली असते !) या गटाच्या मते, अर्थशास्त्राच्या नियमांप्रमाणे दीर्घकालीन विचार करता, ज्यांना ज्यांना नोकऱ्या करायच्या आहेत, त्यांच्यासाठी नोकऱ्या उपलब्ध होऊ शकतात. मात्र, तसे होण्यासाठी सरकारने बाजारव्यवस्थेत हस्तक्षेप करू नये, ही त्यांची अपेक्षा असते. उदाहरणार्थ, किमान वेतनाचा कायदा करणे, नोकऱ्यांमधील सुरक्षितता कायम ठेवणे किंवा कामगार संघटनांनी श्रमाच्या भरमसाठ मोबदल्यासाठी आग्रह करणे इत्यादी प्रकार घडू नयेत, असे त्यांचे मत असते. शिवाय, दीर्घकालात

स्पर्धात्मक बाजारपेठेत, मागणी व पुरवठ्याच्या सिद्धान्तानुसार नोकऱ्यांच्या संधी व त्यासाठी लागणारी श्रमशक्ती यांचे प्रमाण समान होऊन बेरोजगारीची स्थिती संपू शकते, असे म्हटले जाते. पण केन्सने म्हणूनच ठेवले आहे की, दीर्घकालाचा विचार करताना हेही लक्षात ठेवले पाहिजे की, 'दीर्घकाळात आपण सर्व मृत झालेले असू.'

आऊटसोर्सिंगमुळे अमेरिकेतील नागरिकांच्या नोकऱ्या गेलेल्या नाहीत, असे म्हणणाऱ्यांनी हे लक्षात घेतले पाहिजे की, अमेरिकेच्या अर्थव्यवस्थेची स्थिती सध्या चांगली नाही. व्यापारात व अंदाजपत्रकात तूट आहे, आणि त्यातच नोकऱ्यांची कमतरता जाणवत आहे. गेल्या तीन-साडेतीन वर्षांत अमेरिकेच्या अर्थव्यवस्थेतून रोजगारक्षेत्रात नव्याने प्रवेश करणाऱ्यांसाठी, ४० ते ६० लाख नोकऱ्या उपलब्ध व्हायला हव्या होत्या; पण प्रत्यक्षात २० लाखांवर नोकऱ्या त्यांच्या हातातून गेल्या आहेत. महामंदीच्या काळानंतर एवढ्या मोठ्या प्रमाणावर नोकऱ्या जाण्याची अमेरिकेतील ही पहिलीच वेळ आहे. यावरून एवढे तरी स्पष्ट होते की, बाजारपेठीय अर्थव्यवस्थेत नोकरी करण्याची इच्छा असलेल्या सगळ्यांसाठीच नोकऱ्या उपलब्ध होऊ शकतात, असे घडेलच असेही नाही. नोकऱ्या उपलब्ध होण्यासाठी व बेरोजगारीची स्थिती संपविण्यासाठी सरकारची भूमिका ही महत्त्वाची असते. अमेरिकेतील सध्याचे बुश यांचे सरकार ही भूमिका योग्य रीतीने बजावण्यात अयशस्वी ठरले आहे. बेरोजगारीचे प्रमाण कमी असते तर, आऊटसोर्सिंगच्या विरोधात एवढी ओरड झाली नसती.

आऊटसोर्सिंगच्या संदर्भात, विशेषतः भारतासारख्या देशाकडे उच्च तंत्रज्ञानाशी संबंधित अमेरिकेच्या नोकऱ्या जातात तेव्हा, त्यात फारसे काही बिघडत नाही असे जागतिकीकरणाचे समर्थक म्हणतात. त्यांचे नेहमीचे म्हणणे असे की, जागतिकीकरणाला कामगारांनी, कर्मचाऱ्यांनी भिण्याचे काहीच कारण नाही. कारण, बाहेर जाणाऱ्या नोकऱ्या या प्रामुख्याने अकुशल कामगारांच्याच नोकऱ्या असतात. पण, हे तेवढेसे खरे नाही. ते असेही सांगतात की, अशा देशांची उच्च तंत्रज्ञानाची गरज भागविण्यासाठी अमेरिकेसारखे देश आपला वेगळा व्यापार त्यातून वाढवू शकतात. अमेरिकेसारख्या देशांनी विज्ञान व तंत्रज्ञान शिक्षणाचा दर्जा व विविध कौशल्ये वाढविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. हा मुद्दाही फारसा प्रभावी ठरलेला दिसत नाही. चीन व भारतांच्या तुलनेत, अमेरिकेत इंजिनियर होणाऱ्यांची संख्या कमीच आहे. शिवाय अमेरिकेतील इंजिनियर्सच्या तुलनेत चीन किंवा भारतातील इंजिनियर्सना देण्यात येणारा आर्थिक मोबदला हा बराच कमी आहे. त्यामुळे अमेरिकेतील कंपन्या आपला खर्च वाचविण्यासाठी

आऊटसोर्सिंगचा आधार घेणार हेही उघडच आहे. अशा परिस्थितीत अमेरिकेतील किंवा इतर विकसित देशांमधील इंजिनियर्स काय करू शकतात ?

त्यांच्यासमोर तीन पर्याय आहेत. एक, वेतनात कपात मान्य करणे, दोन, बेरोजगार होणे, किंवा तीन, उपजीविकेचा दुसरा मार्ग शोधणे. आऊटसोर्सिंगच्या या प्रश्नासमोर अमेरिकेतील सुशिक्षितांची अशी परिस्थिती होऊ शकत असेल तर जे अप्रशिक्षित आहेत त्यांचे काय होईल ? आज अमेरिका महासत्ता म्हणून आणि नवनवीन संशोधनात जगाच्या पुढे असली तरी अमेरिकेतील अशा उच्च संशोधनाच्या क्षेत्रात संख्येने खूप कमी अमेरिकन नागरिक आहेत. बहुसंख्य अमेरिकन नागरिक हे सामान्य विज्ञान-तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातच आहेत, यात केवळ दैनंदिन कामात नवे तंत्रज्ञान वाढविणे व त्यायोगे उत्पादनाचा दर्जा वाढविणे, अशा प्रकारची कामे असतात. आणि या क्षेत्रातही अमेरिका कायम आघाडीवर राहू शकेल, याची खात्री नाही.

अखेरीस आऊटसोर्सिंगच्या या वादातून दोन गोष्टी स्पष्ट होतात. एक म्हणजे, अमेरिकेने जागतिकीकरणासंबंधीच्या विकसनशील देशांच्या विविध प्रश्नांच्या बाबतीत अधिक सहानुभूती दर्शविली पाहिजे. अमेरिका हा श्रीमंत देश असून तेथे इतर देशांच्या तुलनेने बेरोजगारी कमी आहे व कर्मचाऱ्यांसाठी सामाजिक सुरक्षेसारख्या योजना आहेत, तरीही अमेरिका आपल्या देशातील नागरिकांच्या नोकऱ्यांबाबत काळजीग्रस्त असेल आणि आपल्या उद्योगांना संरक्षण देण्याचा प्रयत्न करीत असेल, तर विकसनशील देशांच्या अशा प्रकारच्या मागण्या (वा कृती) या जास्त न्याय्य ठरू शकतात, हे अमेरिकेने समजून घेतले पाहिजे. दुसरी गोष्ट अशी की, जागतिकीकरणातून अमेरिकेची स्थिती आणखी बळकट झाली तरी कर्मचाऱ्यांची स्थिती आणखी वाईट होऊ शकते, ही वस्तुस्थिती समजून घेणे हे होय. 'नॉर्थ अमेरिकन फ्री ट्रेड ॲग्रीमेंट' (NAFTA) वर सह्या झाल्यानंतर, अमेरिकेतील सरासरी वास्तव वेतन (average real wages) हे व्यवहारात कमीच झालेले आहे. जागतिकीकरणाचा फायदा काहींना होऊ शकला तरी बहुसंख्य नागरिकांना तो होईल असे नाही. त्यामुळे सरकारची भूमिका ही यात अतिशय महत्त्वाची ठरेल, हा धडा या वादातून शिकला पाहिजे.

*(संदर्भ - इंटरनेट व इकॉनॉमिक टाइम्स २५ मे २००४ मध्ये, 'प्रोजेक्ट सिंडिकेट' तर्फे नोबेल पुरस्कार प्राप्त अर्थतज्ज्ञ जोसेफ स्टिग्लिट्झ यांनी लिहिलेला 'आऊटसोर्स्ड् अँड आऊट ऑफ वर्क' हा लेख)*

■■


सामाजिक

# एका नाईलचे पाणी दहा देशांना !

भारतात, नद्यांच्या पाणी वाटपाचा प्रश्न हा बरेचदा ऐरणीवर आलेला असतो. अनेक राज्यसरकारांचा वेळ या कामी खर्च होत असतो, तरी त्यावर सर्वमान्य तोडगा मात्र सापडत नाही. चर्चेच्या गुऱ्हाळात 'जैसे थे' परिस्थिती कायम राहून नागरिक मात्र पाणीटंचाईचा सामना करीतच राहतात. या पार्श्वभूमीवर, आफ्रिकेतील जगप्रसिद्ध नाईल नदीचे पाणी (नाईल नदीचा उगम आफ्रिकेत, युगांडा व इथिओपिया या दोन्ही ठिकाणी आहे. भूमध्यसागराला मिळण्याआधी शेवटच्या टप्प्यात ती इजिप्तमधून प्रवास करते.) एक नाही, दोन नाही तर चक्क दहा देशांनी सामंजस्याने वाटून घेण्याचा प्रयत्न केल्याची घटना जाणून घेणे उद्‌बोधक आहे.

आफ्रिकेतील बुरूंडी, डेमोक्रॅटिक रिपब्लिक ऑफ कांगो, इरिट्रिया, इथिओपिया, केनिया, र्‍वांडा, सुदान, टांझानिया, युगांडा आणि इजिप्त या दहा देशांनी नाईल नदीचे पाणी वाटून घेतले आहे. पाणी वाटपासंबंधीचे विविध प्रश्न सोडविण्यासाठी या दहा देशांच्या सरकारांनी एकत्रितपणे 'नाईल बेसिन इनिशिएटिव्ह' अशी यंत्रणा उभी केली आहे. या विषयावर, सर्व राज्यांच्या संबंधित मंत्र्यांची एक बैठकही नियमितपणे होत असते. पाणी वाटपाच्या प्रश्नावर वाद घालत बसण्यापेक्षा, विकासासाठी जास्तीत जास्त देशांच्या जास्तीत जास्त नागरिकांना हे पाणी कसे उपलब्ध होईल, याचा कृतिशील विचार करणे याला प्राधान्य देण्याचे ठरविण्यात आले. आर्थिक अडचणी दूर करण्यासाठी 'नाईल बेसिन ट्रस्ट फंड' (३६ मिलियन अमेरिकन डॉलर्स) स्थापन करण्यात आला आहे. 'शेअर्ड व्हिजन प्रोग्रॅम' अंतर्गत विविध योजनांची अंमलबजावणी करण्यासाठी या निधीचा उपयोग करण्याचा निर्णय झाला. या निधीचे व्यवस्थापन जागतिक बँकेकडे देण्यात आले आहे.

नाईल नदीच्या पाणी वाटपासंबंधीचा फार मोठा प्रश्न हा इजिप्त व ब्रिटन यांच्या दरम्यान १९२९ मध्ये झालेल्या एका कराराचा आहे. आफ्रिकेत ब्रिटिशांच्या वसाहती होत्या तेव्हाची ही गोष्ट आहे. या कराराप्रमाणे इजिप्तच्या दक्षिणेकडील देशांना अशा कोणत्याही योजना राबविता येत नाहीत की, ज्यामुळे इजिप्तला नैसर्गिकरीत्या मिळणाऱ्या नाईल नदीच्या पाण्याच्या साठ्यात घट होईल. इजिप्तच्या दक्षिणेकडील




नाईलचा मार्ग दाखविणारा नकाशा (संदर्भ -नाईल बेसिन इनिशिएटिव्हची वेबसाईट)

देशांना या करारात सुधारणा करून हवी आहे, कारण या अडचणीमुळे त्यांना विकासाचे अनेक प्रकल्प राबविता येत नाहीत. हा प्रश्न सोडविण्यासाठी इजिप्तला माघार घ्यावी लागण्याची शक्यताच जास्त आहे.

नाईलच्या पाणी वाटपाचा प्रश्न समजून घेताना या नदीचा उगम व प्रवास हे समजून घेणे आवश्यक आहे. (नाईल नदीच्या मार्गाचा नकाशा पाहावा) नाईल नदी

तीन टप्प्यांमधून प्रवास करते. 'पांढरी नाईल, 'निळी नाईल आणि 'मुख्य नाईल' अशा नावाने ती ओळखली जाते. 'पांढऱ्या नाईल'चा उगम युगांडामधील 'लेक व्हिक्टोरिया' येथून झाला. 'निळ्या नाईल'चा उगम इथिओपियातील 'लेक टीयाना' (T'ana) येथे आहे. या दोन्ही नद्यांचा संगम सुदानमधील खार्टोम येथे होऊन 'मुख्य नाईल' नदीचा प्रवास सुरू होतो. हीच नदी इजिप्तमध्ये प्रवेश करते व भूमध्यसागरास जाऊन मिळते. 'पांढऱ्या नाईल'चा उगम 'लेक व्हिक्टोरिया'त असला तरी त्याही आधी तिच्या उगमाचे स्थान बुरूंडीमधील 'रुव्यिरोंझा' नदी हे आहे आणि ही नदी 'कागेरा' नदीची एक उपनदी आहे. युगांडामधून निघालेली 'पांढरी नाईल' मग 'लेक अल्बर्ट ' (युगांडा व कांगोच्या सीमारेषेवर) येथे पोचते. तेथून ती 'व्हिक्टोरिया नाईल' या नावाने प्रवास करीत सुदानमध्ये प्रवेश करते तेव्हा तिची ओळख 'बहर-अल जबल' अशी होते. मग 'बहर-अल-गझल'बरोबर तिचा संगम होऊन ती 'व्हाईट नाईल' होऊन खार्टोमला पोचते. 'निळी नाईल' ही इथिओपियातील 'लेक टीयाना' येथून निघून १५२९ किलोमीटर्सचा प्रवास करून खार्टोम येथे पोचते.

## नाईलवर अवलंबून असलेले जनजीवन

नाईल नदी प्रवासाच्या या तीन टप्प्यांमध्ये सुमारे ३३ लाख ४९ हजार किलोमीटर्सचा प्रवास करते. आणि दहा देशांमधील एकूण सुमारे ३० कोटी नागरिकांपैकी १६ कोटी नागरिक या नदीच्या खोऱ्यावर अवलंबून आहेत. बुरुंडीमधील पन्नास टक्के पाणी वाहत येऊन नाईल नदीच्या पाण्यात मिसळते. येथील बहुसंख्य नागरिकांची उपजीविका शेती व शेतीसंबंधीच्या कामावर अवलंबून आहे. अलीकडच्या काळात, येथील लोकसंख्या वाढती असल्याने विविध ठिकाणी पाण्याचा वापरही वाढला आहे. त्यामुळे येथे पाण्याचा प्रश्न महत्त्वाचा ठरतो आहे. र्वांडामध्येही अशीच परिस्थिती आहे. लेक व्हिक्टोरियाचे अर्ध्यापेक्षा जास्त पाणलोट क्षेत्र टांझानियात आहे. तेथील एकूण लोकसंख्येच्या एक पंचमांश लोकांसाठी हे उपयोगाचे आहे. शेती व मासेमारी ही येथील उपजीविकेची साधने असल्याने याला आर्थिकदृष्ट्याही महत्त्व मिळते.

युगांडा हा देश तर पूर्णपणे या नदीच्या पाणलोट क्षेत्रात येतो आणि मोठ्या प्रमाणावर, जलविद्युत निर्मितीची क्षमता असूनही फक्त ५ टक्के नागरिकांची ऊर्जेची गरज भागत आहे. डेमोक्रॅटिक रिपब्लिक ऑफ कांगोचा फक्त १ टक्का भाग नाईल नदीच्या खोऱ्यात येतो, पण देशाच्या इतर भागाच्या तुलनेत येथील लोकसंख्येची घनता पाच पट जास्त आहे. इथिओपियातील एक तृतीयांश नागरिक निळ्या नाईलवर

अवलंबून आहेत. इरिट्रिया हा देश देखील नाईलच्या सुपीक खोऱ्यावर प्रगतीची आशा धरून आहे. सुदान हा आफ्रिकेतील सर्वात मोठा देश असून नाईल नदीचे दोन-तृतीयांश खोरे या देशात आहे. येथील नागरिकांसाठी पाण्याचा प्रमुख स्त्रोत नाईल नदीच असून ते पाणी पिण्यासाठी, शेतीसाठी व वीज तयार करण्यासाठी वापरले जाते.

सागराला मिळण्याआधी नाईल नदीचा शेवटचा टप्पा हा इजिप्तमधील आहे. इजिप्तमधून वाहणारी ही एकच नदी असल्याने ती या देशाचा प्राण आहे. या देशातील बहुसंख्य (६ कोटी) नागरिक नाईल नदीच्या काठानजीक राहतात. नाईल म्हणताच इजिप्तचेच नाव आठवते ते यामुळे.

**दहा देशांसाठी पाणी वाटपाची योजना**

दहा देशांचे जनजीवन सुरळितपणे चालण्यासाठी नाईल नदीच्या पाणी वाटपाची यंत्रणा चांगली असणे आवश्यक आहे ते असे. ती विविध देशांमधून वाहत असल्याने कोणत्याही एका देशाला बळजबरीने वा संघर्षाने नाईलच्या पाण्याचा उपयोग करता येणार नाही, ही वस्तुस्थिती लक्षात घेऊन सामंजस्याने मार्ग काढण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. म्हणूनच फेब्रुवारी १९९९ मध्ये 'नाईल बेसिन इनिशिएटिव्ह'ची स्थापना करण्यात आली. तसेच नैसर्गिक स्त्रोताचा योग्य वापर करून व गरिबी दूर करून आर्थिक विकास करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले. हे सर्व योग्य प्रक्रियेतून घडावे यासाठी 'स्ट्रॅटेजिक ॲक्शन प्रोग्रॅम' (SAP) व त्याच्या दोन उपशाखांसारख्या काम करणाऱ्या म्हणजे चर्चेच्या माध्यमातून मार्ग काढणारी 'शेअर्ड व्हिजन प्रोग्रॅम' (SVP) आणि कृती करणारी 'सब्सिडियरी ॲक्शन प्रोग्रॅम' (SAP) अशा यंत्रणा उभारण्यात आल्या आहेत.

याशिवाय इजिप्त, इथिओपिया आणि सुदान या देशांसाठी 'इस्टर्न नाईल सबसिडियरी ॲक्शन प्रोग्रॅम' (ENSAP) आणि बुरुंडी, कांगो, केनिया, र्‍वांडा, टांझानिया, युगांडा व इजिप्त आणि सुदान या देशांसाठी 'नाईल इक्विटोरियल लेक्स् सब्सिडियरी ॲक्शन प्रोग्रॅम' (NELSAP) या दोन यंत्रणाही स्थापन करण्यात आल्या. आता या सर्वांचे काम योग्य रीतीने चालू झाले आहे. कायद्याचा आधार घेऊन पाण्याच्या समान वाटपाचे मार्ग काढण्याचे प्रयत्न सुरू आहेत. चर्चा व सर्वमान्य तोडगा याला महत्त्व देऊन कृती व्हावी, असा एक चांगला आदर्श या देशांनी इतरांपुढे ठेवला आहे.

*(संदर्भ - डाऊन टू अर्थ ३० एप्रिल २००४, इंटरनेट)* ■■



# शांततेच्या पाऊलखुणा

## ‘आईनस्टीन इन्स्टिट्यूशन’चा अहिंसात्मक वैचारिक लढा

अहिंसेचा अभ्यास करणे आणि त्याआधारे देशादेशांमधील विविध प्रकारच्या संघर्षांमध्ये शांततेची स्थापना करण्यासाठी अहिंसात्मक मार्गांचा दैनंदिन व्यवहारात उपयोग करणे, हे ध्येय समोर ठेवून ‘द अल्बर्ट आईनस्टीन इन्स्टिट्यूशन’ची स्थापना डॉ. जीन शार्प यांनी १९८३ मध्ये बोस्टन येथे केली. डॉ. शार्प हे येथील ज्येष्ठ संशोधक -अभ्यासक असून ऑक्सफोर्डमधून त्यांनी राज्यशास्त्राची डी.फील. मिळविली आहे. मॅसॅच्युसेट्स् आणि हार्वर्ड येथे त्यांनी आंतरराष्ट्रीय संबंध या विषयात अध्यापनाचे काम केले आहे. ‘द पॉलिटिक्स ऑफ नॉनव्हायोलन्ट ॲक्शन’ (१९७३), ‘गांधी ॲज ए पोलिटिकल स्ट्रॅटेजिस्ट’ (१९७९), ‘सोशल पॉवर अँड पोलिटिकल फ्रीडम’ (१९८०), ‘मेकिंग युरोप अनकॉन्करेबल’ (१९८५), ‘सिव्हिलियन बेस्ड डिफेन्स’ (१९९०), ‘फ्रॉम डिक्टेटरशिप टू डेमोक्रॅसी’ (१९९३, २००२, २००३), ‘वेजिंग नॉनव्हायोलन्ट स्ट्रगलः ट्वेंटीयथ सेंचुरी प्रॅक्टीस अँड ट्वेंटी फर्स्ट सेंचुरी पोटेन्शियल’ (प्रसिद्धीच्या मार्गावर) असे लेखन त्यांनी केले आहे.

या इन्स्टिट्यूशनचे अध्यक्ष आहेत बॉब हेल्वे. अमेरिकेच्या लष्करी महाविद्यालयांमधून शिक्षण घेतल्यानंतर त्यांनी तीस वर्षे लष्करात नोकरी केली. सेवानिवृत्त कर्नल हेल्वे आता स्वेच्छाकार्य संस्थांना अहिंसात्मक मार्गांचा अवलंब करण्याबाबतचा सल्ला वा प्रशिक्षण देतात. म्यानमार, थायलंड, तिबेट, बेलारस,व्हेनेझुएला, सर्बिया अशा अनेक देशांमध्ये त्यांनी कार्य केलेले आहे. हार्वर्ड विद्यापीठाच्या आंतरराष्ट्रीय संबंधांबाबतच्या अभ्यासक्रमात अध्यापनाचे कामही त्यांनी केले आहे.

‘द अल्बर्ट आईनस्टीन इन्स्टिट्यूशन’चे उद्दिष्ट लोकशाहीचे, नागरी स्वातंत्र्याचे रक्षण करणे, हुकुमशाही, जुलुम-जबरदस्ती आणि वांशिक हत्या यांना विरोध करणे, तसेच राजकीय धोरण म्हणून हिंसाचारावर अवलंबून राहण्याला विरोध करणे, हे आहे. ही उद्दिष्टे साध्य करण्यासाठी संशोधन, धोरणात्मक अभ्यास आणि अहिंसात्मक मार्गांचा अभ्यास व कृती यांना उत्तेजन देण्याचा प्रयत्न संस्था करीत असते. या अभ्यासांना वेगवेगळ्या वृत्तपत्रांमधून, सभा व परिषदांमधून प्रसिद्धी देऊन लोकांपर्यंत पोचविण्याचा

प्रयत्न करण्यात येतो. अहिंसात्मक कार्यासाठी स्वेच्छाकार्य संस्थांना व विविध स्तरामधील इच्छुक नागरिकांना मार्गदर्शन करण्याचे काम संस्थेने हाती घेतले आहे.

'अल्बर्ट आईनस्टीन इन्स्टिट्यूशन' असे नाव ठेवण्यामागे एक कारण आहे, असे डॉ. शार्प म्हणतात. नोबेलपुरस्कार प्राप्त पदार्थविज्ञानतज्ज्ञ अल्बर्ट आईनस्टीन हे शांततेचे पुरस्कर्ते होते. अण्वस्त्रे, युद्धे, दडपशाही, हुकुमशाही आणि वांशिक हत्या इत्यादींना त्यांचा विरोध होता. राजकीय हिंसाचार रोखण्यासाठी नवीन व शांततापूर्ण मार्गांचा अवलंब व्हावा, असे त्यांना मनापासून वाटत होते. त्यांच्या काळात, अनेकदा उपलब्ध असलेल्या पर्यायांबाबत ते असमाधानी असायचे; पण तरी, त्यातल्या त्यात त्यांना जो योग्य वाटत असे, त्याला ते पाठिंबा देत. अहिंसेला तर त्यांचा पहिल्यापासूनच पाठिंबा होता. त्यामुळेच की काय, पण अहिंसात्मक चळवळीचे जनक महात्मा गांधी यांच्याबद्दल त्यांना आदर होता. १९५० च्या दशकात तर आईनस्टीन यांनी असे बोलूनही दाखवले होते की, 'महात्मा गांधींचे विचार सध्याच्या काळात उच्चस्थानी आहेत.'

अहिंसात्मक चळवळीबद्दल व त्याच्या यशापयशाबद्दल मात्र डॉ. शार्प यांचे विचार वेगळे आहेत. डॉ. जीन शार्प यांची एक मुलाखत 'पीस मॅगेझीन'ने घेतली आहे. त्यात ते म्हणतात, "अहिंसात्मक चळवळीचे समर्थक बरेचदा असे गृहित धरतात की, एक अहिंसेचा लढा करून झाला की आपल्यासमोर गंभीर प्रश्न उभे ठाकणार नाहीत. पण तसे घडत नाही. महात्मा गांधींनी भारतात, स्वातंत्र्यासाठी अहिंसेचा लढा उभा केला होता. जातीपातींच्या विरोधात ते उभे ठाकले होते. गरिबी दूर करण्याचा विचार त्यांनी केला होता. यापैकी भारताला फक्त स्वातंत्र्य मिळाले. मात्र, तेथे आजही, जातीपातींचे राजकारण आहे. गरिबी दूर झालेली नाही. समाजात विषमता आहेच, आणि एकेकाळी अहिंसेला महत्त्व देण्यात आलेल्या या देशाचे लष्करही सुसज्ज आहे, (आणि या देशाने अण्वस्त्रनिर्मितीही केली आहे !) त्यामुळे गांधींचे कार्य वाया गेले असे काहींना वाटते. एका लढ्याने सगळे प्रश्न सुटतील असे, जसेकाही त्यांना वाटते. तसेच हिंसात्मक लढ्याच्या तुलनेत, अहिंसात्मक लढ्याचे मूल्यमापन करण्यासाठी वा यशापयश विचारात घेण्यासाठी फार उच्च निकष ठेवले जातात.

"आणखीही एक विचारात घेण्यासारखा मुद्दा असा आहे की, गांधींबरोबर ब्रिटिशांच्या विरोधात अहिंसात्मक लढ्यात सहभागी झालेल्या अनेकांचा, 'अहिंसा हे दैनंदिन जीवनातील एक मूल्य' यावर विश्वास नव्हता. ही बाब माझ्या लक्षात आली

तेव्हा, याचा उल्लेख संशोधनात करावा अथवा नाही, या विचारात मी होतो. अखेरीस मी त्याचा उल्लेख केला, पण त्यामुळे नुकसान झाले नाही. उलट, त्यावरून असे लक्षात आले की, अनेक व्यक्तींचा अहिंसेवर एक मूल्य म्हणून किंवा धार्मिक अहिंसेवर विश्वास नसला तरी व्यवहारात ते अहिंसेचा लढा उभा करू शकतात. आणि अहिंसा हे एक मूल्य म्हणून मान्य होण्यापूर्वीही असे घडलेले असू शकते. अहिंसेचा माझा अभ्यास असा पुढे जात होता. त्यानंतर मला सामोआ, कोरिया आणि जिथे अमेरिकन वसाहती होत्या तेथे, तसेच संप वा बहिष्कार झालेल्या ठिकाणी अहिंसात्मक लढा म्हणता येईल, अशी काही माहिती सापडली.

"आणि महात्मा गांधींनी अहिंसा हा एक सिद्धान्त म्हणून पुढे आणला होता. त्याचा गाभा, 'सर्व सरकारे ही नागरिकांच्या आज्ञाधारकपणावर अवलंबून असतात,' हा होता. गांधीजींची ही कल्पना निश्चितच चांगली होती, पण ती मुळात कोठून आली होती ? मग मी थोरो व टॉलस्टॉय अभ्यासले. नागरिकांचा आज्ञाधारकपणा हा धागा मला टॉलस्टॉयच्या विचारात आढळला. यानंतर मी नॉर्वेतील काही लोकांशी चर्चा केली. त्यांनी शत्रूच्या हातातील बाहुले होण्याच्या विरोधात लढा दिला होता. मग संप व बहिष्कार यासंबंधीच्या अभ्यासातून मला अहिंसात्मक लढ्याबाबतचे काही धागेदोरे मिळाले. मग अहिंसात्मक कृतीची मी एक यादीच तयार केली. तेव्हा मला प्रथम १२ मग १८ पद्धती लक्षात आल्या होत्या. आता ही यादी १९८ वर पोचली आहे.

"हिंसा करणाऱ्याला त्याची काहीतरी किंमत चुकवावीच लागते, हे एक सत्य मग पुढे आले आणि ते लोकांच्या काही प्रमाणात तरी लोकांच्या पचनी पडू लागले. त्यामुळे 'हिंसेचा त्याग करा,' हेच आमची संस्था सांगते. काही सामाजिक शास्त्रज्ञांचे असे म्हणणे आहे की, एखादी संस्था जर वाईट असेल आणि ती जर तुम्हाला बंद करावयाची असेल, तर ती संस्था जे काही काम करीत आहे ते काम चांगल्या प्रकारे करणारी दुसरी संस्था तुम्हाला आधी तयार करावी लागेल, मगच पहिली संपुष्टात आणता येईल. हिंसेचेही असेच आहे. आजही जगातून हिंसा संपलेली नाही. याचे मुख्य कारण असे आहे की, हिंसेला अहिंसेचा पर्याय आहे, यावर लोकांचा पूर्ण विश्वास बसलेला नाही. मग यशस्वी झालेले अहिंसात्मक लढे लोकांपुढे आणावे लागतात. मग एखादेवेळी अहिंसा हे मूल्य म्हणून मान्य झाले नाही तरी, तो पर्याय उपलब्ध आहे म्हटल्यावर स्वीकारलाही जातो. असे पर्याय उपलब्ध करून देण्याचे काम आईनस्टीन इन्स्टिट्यूशन करीत आहे." *(संदर्भ - इंटरनेट, पीस मॅगेझीन)* ■■

## जगाच्या पाठीवर...

### जाहिरात क्षेत्रात थायलंडची बाजी

थायलंडमधील जाहिरात कंपन्या अतिशय कल्पक आहेत. आशियात सर्वात जास्त गंमतशीर जाहिराती या थायलंडमधील कंपन्यांच्या असतात. आणि जाहिरातींच्या आंतरराष्ट्रीय महोत्सवात सर्वात जास्त पुरस्कार मिळविण्यात थायलंडच आघाडीवर आहे. अलीकडेच 'कॅनस् लायन्स आंतरराष्ट्रीय जाहिरात महोत्सव' (२००४) झाला; त्यावेळी थायलंडने २३ पुरस्कार मिळविले. (खालील तक्ता पाहावा) गेल्या चार वर्षात एकाही देशाला एवढे पुरस्कार मिळविता आले नाहीत. शिवाय टेलिव्हिजनवरील जाहिरातींसाठी एक 'गोल्ड ॲवार्ड' देण्यात येते, ते देखील थायलंडने मिळविले आहे. थायलंडमध्ये जाहिरात तयार करणारे कल्पक आहेतच, शिवाय तेथे अशा कल्पक लोकांना वावही भरपूर दिला जातो आणि सामान्य नागरिकही कल्पक जाहिराती उचलून धरतात. थायलंडमधील कल्पकतेच्या मागे तेथील संस्कृती व नागरिकांची लकब आणि विचार करण्याची पद्धत असावी, असे म्हटले जाते. थायलंड हा सांस्कृतिकदृष्ट्या बळकट व आत्मविश्वास असलेला देश आहे. येथे साम्राज्यवाद नव्हता आणि येथील राजेशाहीचा एक इतिहास आहे पण त्याला लोकशाही सरकारची जोडही आहे. थायी नागरिक जीवनाचा स्वीकार व विचार हसत-खेळत करतात आणि त्यांना हसायला व मजा करायला आवडते, असा निष्कर्ष संबंधितांनी काढला आहे.

जाहिरात महोत्सवातील पुरस्कारांची संख्या

| देश | वर्ष २००३ | वर्ष २००४ |
|---|---|---|
| थायलंड | १० | २३ |
| सिंगापूर | -- | ५ |
| जपान | २ | ८ |
| हाँगकाँग | -- | १ |
| मलेशिया | १ | २ |
| भारत | २ | १ |
| चीन | १ | ४ |

*(संदर्भ - एफ.ई.ई.आर., १३ मे २००४)*

## जैवतंत्रज्ञानयुक्त गव्हाबाबत मोन्सॅन्टोची माघार

काही विशिष्ट क्षेत्रांमध्ये जैवतंत्रज्ञानाचे महत्त्व वाढत असले तरी जैवतंत्रज्ञानयुक्त अन्नधान्याला जगभरात बऱ्याच प्रमाणात विरोध होतो आहे. विशेषतः अमेरिकेने जैवतंत्रज्ञानाला पाठिंबा दिला आहे तर, युरोपमधील बाजारपेठेने अमेरिकेन कंपन्यांचे जैवतंत्रज्ञानयुक्त धान्य वा इतर खाद्यपदार्थ घेण्याचे नाकारले आहे. या पार्श्वभूमीवर जैवतंत्रज्ञानाचा पुरस्कार करणारी मोन्सॅन्टो ही अमेरिकन कंपनी जैवतंत्रज्ञानयुक्त गव्हाच्या संदर्भात अडचणीत आली आहे. अमेरिका व युरोप येथे जैवतंत्रज्ञानसमर्थक व विरोधक असे दोन गट उभे राहिले आहेत. युरोपमध्ये जैवतंत्रज्ञानयुक्त गव्हाचा ब्रेड खाण्यास नागरिकांनी मोठा विरोध दर्शविला आहे. आणि मोन्सॅन्टोची गव्हाची मोठी बाजारपेठ युरोपमधीलच आहे. पण ही बाजारपेठ मिळण्याची शक्यता दुरावल्याने मोन्सॅन्टोला जैवतंत्रज्ञानयुक्त गहू बाजारपेठेत आणण्याचा निर्णय रद्द करावा लागला आहे. कंपनीच्या या निर्णयामुळे जैवतंत्रज्ञानाला विरोध करणाऱ्या गटाची सरशी झाल्याचे मानले जात आहे.

खरे तर, जैवतंत्रज्ञानयुक्त गव्हाच्या संशोधनासाठी या कंपनीने गेल्या सात वर्षांत करोडो रुपये खर्च केले होते. शिवाय त्यांनी या गव्हाचे उत्पादन ५ ते १५ टक्क्यांनी वाढू शकते असेही सिद्ध केले होते. पण आता गव्हाची बाजारपेठ उपलब्ध नसल्याने मोन्सॅन्टोने जैवतंत्रज्ञानयुक्त मका, कापूस व रेपसीड या तेलबिया यांच्यावरच लक्ष केंद्रित करण्याचे ठरविले आहे. *(संदर्भ - गार्डियन न्यूजपेपर्स लिमिटेड)* ■■

## कीटकनाशकांवरील बंदी व बालकांचे आरोग्य

कीटकनाशकांचे गर्भावर होणारे वाईट परिणाम (पाहा - अर्थबोधपत्रिका, जानेवारी २००४) आता अनेक देशांमधील संशोधकांना लक्षात येत आहेत. आणि तेच, कीटकनाशकांच्या वापरावर बंदीसाठी कारणीभूत ठरत आहेत. अमेरिकेतील पर्यावरणीय संरक्षण समितीने, मॅनहॅटन भागात, घरोघरी वापरण्यात येणाऱ्या कीटकनाशकांवर बंदी घातल्यानंतर त्या भागातील नवजात बालकांचे जन्माच्या वेळचे वजन वाढल्याचे अलीकडेच आढळले आहे. इ.स. २००० मध्ये क्लोरोपायरीफॉस आणि डायझिनॉन या दोन कीटकनाशकांवर बंदी घालण्यात आली होती. पूर्वी या कीटकनाशकांच्या संपर्कात येणाऱ्या गर्भवती स्त्रियांची बाळे कमी वजनाची निपजली होती. कमी वजनाच्या बाळांचे आरोग्य हे सततच्या आजारपणाने त्रस्त असू शकते, म्हणून ही खबरदारी घेण्यात आली आहे. *(संदर्भ - डाऊन टू अर्थ, ३० एप्रिल २००४)* ■■

# नागरी संघटनांमध्ये भारत आघाडीवर

जगभरात सध्या सुधारणांचे वारे वाहात आहेत. उद्योजकता वाढविणे किंवा सामाजिक पातळीवर एकत्र येऊन सुधारणा करणे वा सामाजिक जाणीवा वाढवून विविध कृतिशील योजना राबविणे याला, अलीकडे एक वेगळे महत्त्व प्राप्त झाले आहे. नागरिकांच्या अशा विविध संघटना आणि त्यांचे कार्य यासंबंधी न्यूयॉर्कमधील डेव्हिड बॉर्नस्टीन यांचे 'हाऊ टू चेंज द वर्ल्ड' असे एक नवीन पुस्तक ऑक्सफोर्ड युनिव्हर्सिटी प्रेसने प्रसिद्ध केले आहे. त्यात बॉर्नस्टीन यांनी म्हटले आहे की, अशा सर्वात जास्त संघटना (सुमारे २० लाख) भारतात आहेत. लॅटिन अमेरिका, आफ्रिका आणि आशियातील इतरही काही देश यात हळूहळू प्रगती करत आहेत. खालील तक्त्यावरून हे स्पष्ट होईल.

| देश | नागरिकांच्या संस्थांची संख्या |
|---|---|
| इंडोनेशिया | २००० |
| बांगलादेश | २०,००० |
| भारत | २०,००,००० |
| स्लोव्हाकिया | १२,००० |
| सेंट्रल युरोप | १,००,००० |
| फ्रान्स | ७०,००० |
| कॅनडा | २,००,००० |
| ब्राझील | ४,००,००० |
| आंतरराष्ट्रीय पातळीवरील नागरिकांच्या संघटना | २६,००० |

*(संदर्भ - हाऊ टू चेंज द वर्ल्ड, डेव्हिड बॉर्नस्टीन, ऑक्सफोर्ड युनिव्हर्सिटी प्रेस, इकॉनॉमिक टाइम्स)* ■■

# भारतातील नागरिकांचा उपभोगखर्च

भारतातील सर्वसामान्य मध्यमवर्गीय नागरिक आपली मिळकत प्राधान्याने कोणकोणत्या बाबींवर खर्च करतो ? खाणेपिणे ही बाब भारतीयांसाठी सर्वात खर्चाची आहे. सुमारे ४८.८ टक्के खर्च हा पोट भरण्यासाठी केला जातो. त्या खालोखाल वाहतूक व दळणवळणावर आणि निवारा व तत्सम बाबींवर खर्च होतो. आरोग्य व शिक्षणावरही भारतातील मध्यमवर्ग खर्च करतो.

मात्र, भारत हा विकसनशील व मध्यमवर्गीयांचा देश असल्याने चैन-मौज ही मध्यमवर्गीयांना मोठ्या प्रमाणात परवडणारी नाही. देशाचा विकास होऊन नागरिकांची पावले समृद्धीकडे वळतील तेव्हा मनोरंजन व वैयक्तिक चैनीच्या वस्तूंवर खर्च करण्याचे त्यांचे प्रमाण वाढेल. सामान्य नागरिकांची काही महत्त्वाच्या बाबींवर होणाऱ्या खर्चाची टक्केवारी (२००१-२००२ या वर्षातील) खालील तक्त्यात दिली आहे.

| खर्चाच्या बाबी | खर्चाची टक्केवारी |
|---|---|
| खाणेपिणे | ४८.८ % |
| कपडे व वैयक्तिक खर्च | ४.१ % |
| घरभाडे व तत्सम | ११.५ % |
| फर्निचर व इतर यंत्रसामग्री | २.९ % |
| आरोग्य | ५.३ % |
| वाहतूक व दळणवळण | १२.९ % |
| मनोरंजन व शिक्षण | ३.६ % |

*(संदर्भ - सेंट्रल स्टॅटिस्टिकल ऑर्गनायझेशन, इकॉनॉमिक टाइम्स)* ■■

# भारतातील संगणकांची वाढती विक्री

भारतात १९९५-९६ पासून २००३ पर्यंत, संगणकाची विक्री सुमारे दसपटीने वाढली आहे. नुकत्याच संपलेल्या आर्थिक वर्षात अंदाजे तीस लाख संगणक विकले गेले आहेत. २००४-२००५ या वर्षात संगणकाची विक्री ४० लाखावर जाईल, असा अंदाज आहे. *(संदर्भ - एम.ए.आय.टी., इकॉनॉमिक टाइम्स)* ■■

*अर्थबोधपत्रिकेत वैचारिक ग्रंथांचा परिचय दिला जाईल. प्रकाशकांनी संस्थेच्या नावे ग्रंथ पाठवावेत. - संपादक*

अर्थकारणाच्या प्रत्येक चळवळीत सक्रीय सहभागी

स्तंभयोरुभयोंमध्ये दिपमाला विराजते
महाराष्ट्रधिकोषस्य मुद्रेयं लोकमङ्गला

बँक ऑफ महाराष्ट्र
(भारत सरकारचा उपक्रम)

: केंद्रीय कार्यालय :
'लोकमंगल', 1501, शिवाजीनगर,
पुणे - 411 005.
Web : www.maharashtrabank.com

## अर्थबोधपत्रिका भेट अंक योजना

अर्थबोधपत्रिका या वैचारिक उपक्रमात सहभागी झाल्याबद्दल आपले अभिनंदन व आभार. यात आपल्यासारख्या अनेकांचा सहभाग वाढावा, यासाठी आम्ही आपल्याकडून एक छोटी मदत मागत आहोत.

अर्थबोधपत्रिका आणखी काही उत्सुक व्यक्तींपर्यंत पोचण्यासाठी आमची योजना अशी की, आपण आपल्या परिचयातील अशा व्यक्तींची नावे व पत्ते पोस्टकार्डने किंवा आंतरदेशीय पत्राने आम्हाला कळवावीत. म्हणजे त्यांना आम्ही एक अंक भेट म्हणून पाठवू. अंक आवडल्यास त्यांना सभासद होता येईल.

## अर्थबोधपत्रिकेच्या जिज्ञासू सदस्यांसाठी सुवर्णसंधी

भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी या संस्थेच्या संदर्भ ग्रंथालयात सामाजिक, आर्थिक, राजकीय व इतर विषयांवरील सुमारे बारा हजारावर ग्रंथ आहेत. हे ग्रंथालय अर्थबोधपत्रिकेच्या सदस्यांना विनामूल्य उपलब्ध करून देण्यात येत आहे. अधिक तपशीलासाठी व्यवस्थापकांकडे चौकशी करावी.

# ख्रिस्त, टॉलस्टॉय आणि महात्मा गांधी

*नागरिकांना निर्भय होण्याची शिकवण देऊ न अहिंसेची चळवळ उभे करणारे महात्मा गांधी, रशियातील विचारवंत लेखक टॉलस्टॉय यांच्या विचारांनी प्रभावीत झाले होते. लिओ टॉलस्टॉय यांचे, शांततेच्या मार्गाकडे जाणारे, अहिंसेवरील 'द किंगडम ऑफ गॉड इज विदिन यू' असे एक पुस्तक (१८९३) आहे. टॉलस्टॉय यांचे मत असे होते की, हिंसेला अथवा वाईटाला हिंसेने अथवा वाईटानेच उत्तर दिले तर, हिंसा वा वाईट गोष्टी कधीच संपणार नाहीत. गांधींनी हाच विचार अहिंसात्मक चळवळींमधून पुढे आणला.*

*टॉलस्टॉय यांचे अहिंसेचे विचार येशू ख्रिस्ताच्या शिकवणीतून तयार होत गेले. 'सरमन ऑफ माउंट' मध्ये येशू ख्रिस्तांनी सांगितलेल्या तत्त्वांपैकी पाच तत्त्वे टॉलस्टॉय यांनी आचरणात आणण्याचा प्रयत्न केला. ती पाच तत्त्वे अशी: (१) आपल्या मनात कोणाविरूद्ध वाईट भावना (किल्मिष ठेवू नका, सर्वांवर प्रेम करा, कुणालाही अपशब्दांनी दुखवू नका. (२) आचार-विचारात कमालीची शुद्धता व साधेपणा आणण्याचा प्रयत्न करा. (३) वर्तमानात जगा, भविष्याची काळजी करू नका. शपथा व वचन या गोंधळात पडू नका. (४) हिंसेचा वापर करून हिंसेला हिंसेने उत्तर देऊ नका. त्यापेक्षा अपमान सहन करून, त्यागाचा मार्ग धरा. (५) शत्रूच्या जागी आपण स्वतः आहोत असे समजून शत्रूवर आणि आपण ज्याचा तिरस्कार करीत असतो त्याच्यावरही प्रेम करायला शिका.*

*एक व्यक्ती आपल्या स्वतःपासून या विचारांचा अवलंब करू शकेल व त्यानंतर कुटुंब, समाज, देश, वंश या सर्वांना ही संकल्पना व्यापून टाकेल आणि निखळ मानवतावाद जगात स्थान मिळवू शकेल, असे टॉलस्टॉय यांना वाटले होते. लष्करी कारवाईवर विश्वास ठेवणारा ख्रिश्चन समाज हा ख्रिस्ताच्या मार्गदर्शनाप्रमाणे चालणारा नाहीच, असेही त्यांचे मत झाले होते.*

*आजही हिंसेने हिंसाच जन्माला येते, शांतता प्रस्थापित होत नाही, हे आपण अनुभवतोच आहोत.*

*(संदर्भ - इंटरनेट)* ■■

RNI, Regn.No. MAHMAR/2002/9806
Declaration Ref. P.H.M./S.R./61/VIII/2003
Postal Regn.No.PR/RNP/PNW/M/231/2003-2006

# भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी

**स्थापना** ■'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी' ही संस्था प्रसिध्द अर्थतज्ज्ञ वि. म. दांडेकर यांनी १९७० साली स्थापन केली.

**उद्दिष्टे** ■भारताच्या सामाजिक, राजकीय, व आर्थिक समस्यांचा अभ्यास व संशोधन करणे. ■अभ्यासक, संशोधक, सामाजिक व राजकीय कार्यकर्ते, शासनकर्ते, उद्योजक, उद्योग व्यवसायातील वरिष्ठ अधिकारी व सामान्य जनता यांना वरील विषयाचे ज्ञान व माहिती देणे. ■इंग्रजी व इतर भारतीय भाषांमध्ये संदर्भित विषयांवरील साहित्य / पत्रके / पुस्तिका योग्य नमुन्यांत तयार करुन प्रकाशित करणे.

**उपक्रम** ■संस्थेतर्फे १९८९सालापासून, भारताच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय विचारांना वाहिलेले एक इंग्रजी त्रैमासिक('जर्नल ऑफ इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी') चालवले जाते. ■संस्थेतर्फे वेळोवेळी, विविध विषयांवर अभ्यासशिबिरे, कार्यशाळा, चर्चासत्रे, गटचर्चा यांसारखे कार्यक्रम आयोजित केले जातात. ■अलीकडे, संस्थेतर्फे सर्व सामान्य माहिती विभिन्न वाचकांना देणाऱ्या, वेगवेगळ्या विषयांवरील छोट्या पुस्तिका तयार करून वितरित करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे.

## - संस्थेचे नियंत्रण मंडळ -

●अजित कर्णिक ●विकास चित्रे ●मृणाल दत्तचौधरी ●कुमुदिनी दांडेकर
●ललित देशपांडे ●द.ना. धनागरे ●आनंद नाडकर्णी ●रमेश पानसे
●मनोहर भिडे ●नीळकंठ रथ ●के. एन्. राज ●व्ही.एम्.राव ●ए.वैद्यनाथन
●सत्यरंजन साठे ●रामदास होनावर

**इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी (भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी) पुणे या संस्थेच्या मालकीचे हे मासिक, मुद्रक व प्रकाशक रामदास होनावर यांनी एस. के. प्रिंटर्स, परज अपार्टमेंट, २०५ शनिवार पेठ, पुणे - ४११०३० येथे छापून 'अर्थबोध', ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग, पुणे - ४११०१६ येथून प्रकाशित केले. संपादक : रमेश पानसे**